# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001

YEAR : 34) 1st January 2009 ( No : 01

## *Revision of Pay-Scales of Teacher under the Purview of the university Grants Commission*

# STATEMENT BY MINISTER OF STATE (HRD) IN THE LOK SABHA

**Tuesday 16th December 2008**

Following is the text of the statement made by Smt. D. Purandeswari, Minister of State in the Ministry of Human Resource Development, regarding **Revision of Pay Scales of Teachers** in Universities and Colleges, in Lok Sabha today :

"Sir, this august House has expressed its concern, from time to time, for the need to strengthen the quality of higher education in the country. One of the critical factors affecting the quality of universities and institutions imparting higher education, is our inability **to attract and retain young and talented persons to the teaching profession,** leading over a period of time to shortage of teachers in central as well as state universities and other higher educational institutions. It is estimated that in Central Universities and constituent colleges thereof, approximately twenty-five percent of posts of teachers are lying vacant. Vacancies in teaching posts in State level institutions are known to be even higher.

As a sequel to the 6th Central Pay Commission, the University Grants Commission (UGC) had constituted a Pay Review Committee under the Chairmanship of Prof. G.K.Chadha, Member, Economic Advisory Council to the Prime Minister on 6th September, 2007 for recommending, among other things, the ways and means of attracting and retaining talented persons in the teaching profession and furtherance of research in the University system. The Committee submitted its report to the University Grants Commission on 3rd October, 2008 and the UGC furnished its recommendations on 10th October, 2008. An Empowered Committee was constituted on 10th October, 2008 and based on its recommendations, the proposals formulated by the Ministry were considered by a Committee of Secretaries in its meeting held on 5th December, 2008. **I am happy to inform the House that Ministry's proposals have since been approved by the Cabinet on 15th December, 2008.** I also take this opportunity to share the important features of the revised pay scales and service conditions for teachers in Universities and Colleges as approved by the Government:

(i) There shall be **only three designations** in respect of teachers in universities and colleges, namely, Assistant Professors, Associate Professors and Professors.

(ii) No one shall be eligible to be appointed, promoted or designated as **Professor,** unless he or she possesses a Ph.D. and satisfies other academic conditions, as laid down by the University Grants Commission (UGC). This shall, however, not affect those who are already designated as 'Professor'.

(iii) In place of "Grade Pay" as applicable to Central Government employees, the term "**Academic Grade Pay"** (AGP) shall be used for the teachers and equivalent positions. Different Grade Pays of Rs. 6000, Rs.7000, Rs. 8000, Rs.9000, Rs.10000 and Rs.12000 have been approved as AGP for teachers and equivalent positions.

(iv) Higher Academic Grade Pay of Rs. 6000 has been recommended for all Assistant Professors at the entry level so as to make it more attractive compared to the **entry level Grade Pay** for the Civil Services and other professionals under the 6th Central Pay Commission.

(v) Five non-compoundable advance increments shall be given (as against 4 at present) at entry as Assistant Professor for the degree of **Ph.D**. obtained in the relevant discipline and if the same is from a university complying with the process prescribed by the UGC in respect of enrolment, course-work and evaluation of the degree of Ph.D. At entry level, teachers possessing **M.Phil** or post graduate degrees such as **M.Tech/LL.M** etc., in the relevant professional courses as approved by the relevant statutory councils shall be given 2 non-compounded advance increments. Those who acquire these degrees in the relevant discipline while being in service shall be allowed three **non-compounded advance increments** for Ph.Ds and one increment for M.Phil or post graduate degree acquired in the relevant professional course such as **M.Tech/ LL.M.** etc.

(vi) For the first time ever, posts of Professors shall be introduced in both under-graduate and post-graduate colleges. The number of posts of **Professors in UG Colleges** shall be 10 percent of the number of posts of Associate Professors. There shall be as many posts of Professors in PG Colleges as the number of Departments.

(vii) 10% of the posts of **Professors in universities** shall be in higher Academic Grade Pay of Rs. 12000 with prescribed eligibility conditions.

(viii) **NET shall be compulsory for appointment** at the entry level of Assistant Professor, subject to the exemptions to Ph.Ds in respect of those persons obtaining the award through a registration, course-work and evaluation process, as have been/ or may be laid down by the UGC through its regulations, and so adopted by the University. NET shall not be required for such Masters' programmes for which NET is not available.

(ix) Those who are presently **working as Lecturer (Selection Grade) or Reader** shall continue to be so designated till they become eligible for the post of Associate Professor.

(x) **Parity between teachers and the Librarians/ Directors of Physical Education** shall be maintained, except for the age of superannuation, which for Librarians/ Physical Education personnel shall continue to be 62 years.

### GOVERNMENT RESOLUTION ISSUED

Government of India, Ministry of Human Resource Development Department of Higher Education, New Delhi, issued the Government Resolution No. 1-32/2006-U.II/U.I(1) dated the 31st December, 2008, on the following Subject "Scheme of revision of pay of teachers and equivalent cadres in universities and colleges following the revision of pay scales of Central Government employees on the recommendations of the Sixth Central Pay Commission."

The same will be published in the

**NEXT BULLETIN.**

(xi) Though the posts of **Registrars, Finance Officer, Controller of Examinations,** Deputy Registrars and their equivalent posts were not within the purview of the Pay Review Committee of UGC, their pay scales have also been decided by the Cabinet.

(xii) According to the past practice, **financial assistance** will be provided by the Central Government to the State Governments which may opt for these revised pay scales, **to the extent of 80% of the additional expenditure** involved in the implementation of the revision for the duration from **1.1.2006 to 31.3.2010,** subject to the condition that the entire pay revision/ pay scales package scheme, together with all the conditions laid down in this regard by the UGC by way of Regulations, and other reform measures are implemented by the State Governments as a composite scheme. However, the State Governments shall be free to implement revised scales of pay from a date later than 1.1.2006 and also to prescribe higher scales of pay, depending on their local conditions. However, the Central Assistance shall be limited to the UGC scales of pay and only for the period ending on 31.3.2010.

(xiii) While the revision of pay will take effect from 1.1.2006, the **allowances** (except DA) and advance increments etc. shall take effect from 1.9.2008.

(xiv) All prescribed **requirements of Selection** other than those mentioned above shall continue to be applicable.

Under the revised Scheme, Assistant Professors have been placed in the Pay Band of Rs. 15600-39100 entering at the AGP of Rs. 6000. A teacher with a Ph.D.degree can move from the post of Assistant Professor to Associate Professor after **completion of 12 years** of service as Assistant Professor, spending 4 years at the AGP of Rs. 6000, 5 years at the AGP of Rs. 7000 and 3 years at the AGP of Rs. 8000. Teachers with M.Phil and those with a post graduate degree in a professional course entering as Assistant Professors can become Associate Professor **after 13 years** of service. Those with neither Ph.D. nor M.Phil. etc. shall qualify to become Associate Professor **after 14 years** of service as Assistant Professor.

The Associate Professors have been placed in the Pay Band of Rs. 37,400-67,000 with Grade Pay of Rs. 9,000. While, under the existing scheme, teachers without Ph.D. could rise up to the post of Lecturer (Selection Grade), they can now go up to the level of Associate Professor, based on the prescribed selection process.

As against a period of 17 years for a teacher possessing Ph.D. at the entry level to be eligible to become Professor through selection, the present decision of the Government would enable them to be **selected as Professor after 15 years.**

A teacher with 10 years as Professor would be eligible to be considered against 10 percent of the posts in the higher Academic Grade Pay of Rs. 12000.

Sir, we have begun a process of restoring the dignity and pride in being associated with the teaching profession. This decision to improve pay and other emoluments and to provide more attractive service conditions to the teachers **is only one of the several steps required to attain the broader objective of improving the quality of higher education.** This august House would, I hope, agree that this is a significant step towards that goal. I place on record my gratitude for permitting me to make this statement amidst important business before the House."

* * *

## ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS

*(Regd. under Act. XXI of 1860)*

### AIFUCTO Statement on Pay Revision Announcement

Prof. Thomas Joseph, President : : Prof. Asok Burman, General Secretary

**PRESS RELEASE : 18.12.2008**

## TEACHERS FLAY REDUCTION IN CENTRAL ASSISTANCE AND DEMAND UNIFORM AND SIMULTANEOUS IMPLEMENTATION OF REVISED UGC PAY SCALES THROUGHT OUT THE COUNTRY

The All India Federation of University and College Teachers' Organizations (AIFUCTO) **welcomes the end of uncertainty** over the announcement of pay scales by MOS (HRD). Some of the recommendations of Prof. Chadha Committee have been accepted and the Selection Grade Teachers/Readers have been declared to be eligible for career advancement to the post of Associate Professor. **The AIFUCTO demand for the introduction of Professor Post in all colleges has also been accepted.**

At the same time, the AIFUCTO notes with great concern that some very important recommendations of Prof. Chadha Committee have not been accepted. The AIFUCTO points out that the decision of the Union Government to **cut down Central assistance** for the implementation of VI UGC Pay Package to 80% of the additional expenditure and to limit its availability only to four years and three months will create huge problems in the implementation of the revised pay scales in many States.

The Chadha Committee had recommended 100% central assistance for first five years and 50% for the next five years for the implementation of the new scales by the States. It had also recommended **uniform and simultaneous implementation** of the entire package by all the States. The substantial reduction in the Central assistance and the choice given to the States to change the date of implementation, Prof Thomas Joseph and Prof Asok Burman noted, raise serious doubts about the resolve of the Govt. in improving the quality of education uniformly through out the country by attracting and retaining talent in the teaching profession.

The AIFUCTO demands that the MHRD ensure **complete parity between Librarians/DPEs"** with their teacher counterparts. The rejection of AIFUCTO demand in this regard is unacceptable .

The AIFUCTO also strongly objects to the **non-implementation of the cadre of Senior Associate Professor** as recommended by the Chadha Committee. The AIFUCTO demands that all existing **Selection Grade Lecturers and Readers** as on 1.1.2006 with requisite years of service be automatically moved into the post of Associate Professor.

**The reduction in the grade pay of existing posts** of Lecturer/Reader /Professor militates against all accepted norms of fair play in pay revision. The AIFUCTO demands that the Government modify its present decision appropriately, by restoring the positive recommendations of the Chadha Committee and the UGC and by abolishing the **needless procedure of selection to the post of Associate Professor.**

There is no mention of the PRC recommendation of allowing the switch from **CPF to GPF,** providing the existing assured pension scheme to teachers appointed since 1.1.2004, **which is very disappointing to new recruits.**

The National Executive Committee of AIFUCTO, which meets at Delhi on 4th January, will critique the government decisions and **chart out a programme of country wide agitation demanding inclusive modifications in the new UGC pay package and its uniform and simultaneous implementation throughout the country** with immediate effect.

**Thomas Joseph,** *President* **Asok Barman,** *G. Secretary*

* * *

# MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*Registered under the Trade Union Act 1926, Reg.No.By-II-8162 of 1985*

Affiliated to the All India Federation of University and College Teachers' Organisations (AIFUCTO)

*Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.*

President
**Prof. C.R.Sadasivan**
R.K.Gokuldham, A/205, S.V.Road, Borivli (West)
Mumbai - 400 092.
Tel. : 022 - 2806 3667 / 5693 8030

General Secretary
**Prof. E.H.Kathale**
N/162, Reshimbagh,
Nagpur - 440 009.
Tel. : 0712 2741098


**दि. २० डिसेंबर, २००८**

**प्रति,**
**मा. श्री राजेश टोपे,**
उच्च शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य,
कॅम्प, नागपूर.

**विषय :- विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारशीलेली व केंद्र शासनाने संमत केलेली सुधारित वेतनश्रेणी महाराष्ट्रातील महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना ताबडतोबीने लागू करण्याचा शासन निर्णय प्रसृत करण्याबाबत -**

**संदर्भ** :- केन्द्र शासनाचे मानव संसाधन राज्य मंत्री यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यासंदर्भात दिनांक १६ डिसेंबर २००८ रोजी दुपारी ४ वाजता लोकसभेत केलेले निवेदन.

**महोदय,**

केन्द्र शासनाचे मानव संसाधन राज्य मंत्री यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यासंदर्भात दिनांक १६ डिसेंबर २००८ रोजी दुपारी ४ वाजता लोकसभेत निवेदन केले. (निवेदनाची अधिकृत प्रत सहपत्र म्हणून जोडलेली आहे.) महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना ही वेतन श्रेणी लागू करण्याचे बाबतीत राज्यस्तरावरील शासन निर्णय काढणे आवश्यक आहे.

(२) संदर्भात नमूद केलेले निवेदन काळजीपुर्वक पाहिल्यास त्यात परिच्छेद १२ मध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे. "According to the past practice, financial assistance will be provided by the Central Government to the State Governments which may opt for these revised pay scales, to the extent of 80 % of the additional expenditure involved in the implementation of the revision for the duration from 1/01/2006 to 31/03/2010"

(३) महाराष्ट्रात जवळ जवळ २० लाख सरकारी व निमसरकारी कर्मचारी व शिक्षकांना सुध्दा वेतनश्रेण्या लागू होणार आहे व त्या संदर्भात केन्द्र शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळत नाही. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत मात्र केन्द्र शासनाकडून पहिल्या ५ वर्षाच्या कालखंडामध्ये येणा-या अतिरिक्त अर्थभारापैकी ८० टक्के भार केन्द्र शासनांकडून अनुदानरुपाने मिळत असतो. तो यापूर्वीही प्रत्येक वेळी मिळत आला आहे. पण तरीही दरवेळी इतर शासकीय व निमशासकीय कर्मचा-यांपेक्षा विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे संदर्भात शासन निर्णय अनेक महिन्याच्या विलंबाने निघाल्याचे अनुभव आहेत.

(४) राज्यस्तरावरील प्राध्यापकांची संघटना म्हणून याबाबतीत एमफुक्टोला या पूर्वी १/१/८६ व १/१/९६ च्या सुधारित वेतनश्रेणी लागू होत असतांना आलेले अनुभव हे निश्चितपणे कटू आहेत. केंद्राने जे मान्य केले ते राज्यामध्ये जसेच्या तसेच लागू करण्यात यावे या मागणीसाठी महाराष्ट्रातील प्राध्यापकांना निदर्शने, निषेध-दिन, सामुहिक रजा आंदोलन, बेमुदत संप इत्यादींचा अवलंब करावा लागला ही वस्तुस्थिती आहे.

**(अ) १ जानेवारी १९८६ पासून लागू करण्यात आलेल्या वेतन श्रेणी बाबत** :- सुधारित वेतनश्रेणीच्या संदर्भात मेहरोत्रा समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यावर आपला निर्णय घेऊन केंद्र शासनाकडे पाठविला. केन्द्रशासनाकडे ही बाब अनेक महिने पडून राहिली. त्यावर निर्णय होत नसल्यामुळे शेवटी अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाला (आयफुक्टो) ४ ऑगष्ट, १९८७ पासून बेमुदत संपाचा निर्णय घ्यावा लागला. तो संप ३० दिवस चालू होता. ४ सप्टेंबर, १९८७ रोजी केंद्र शासनाचे पातळीवर वाटाघाटी होऊन संप मागे घेण्याचा निर्णय घेण्यांत आला. महाराष्ट्रात मात्र हा संप सुरु राहिला. "केन्द्राने जे मान्य केले ते महाराष्ट्रात आम्ही लागू करु" एवढे निवेदन महाराष्ट्र शासनाकडुन होण्यासाठी २० दिवस पर्यंत हा संप आमच्या संघटनेला सुरु ठेवावा लागला. महाराष्ट्र शासनाशी वाटाघाटी होऊन २३ सप्टेंबर, १९८७ रोजी संप मागे घेण्यात आला. संघटनेबरोबर करण्यात आलेल्या करारामध्ये नमुद केल्याप्रमाणे सुधारित वेतन श्रेणीचे आदेश काढण्यात न आल्यामुळे सभागृहात १९८७ ला प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यावेळी सुधारित वेतन श्रेणीचे आदेश चार महिन्यात काढण्यात येतील असे मा. शिक्षण मंत्र्यांनी आश्वासन दिले. त्यानंतरही आदेश न निघाल्यामुळे संघटनेस १२ डिसेंबर, १९८८ पासून परत बेमुदत संप करावा लागला. हा संप १८ जानेवारी,१९८९ पर्यंत सुरु राहीला. १८ जानेवारीस शासनासोबत पुन्हा चर्चा होऊन संघटनेसोबत करार करण्यात आला व संप १९ जानेवारी, १९८९ पासून मागे घेण्यात आला. २७ फेब्रुवारी, १९८९ ला शासननिर्णय निघून सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यात आली.

**(ब) १/१/१९९६ पासून लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतन श्रेणीबाबत** :- १/१/१९९६ पासून लागू करण्यात आलेली वेतन श्रेणी अंमलात आणतांना परत इतिहासाची पुनरावृत्ती झाल्याचे आपल्या लक्षात येईल. विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रो. आर.पी. रस्तोगी यांचे अध्यक्षतेखाली वेतन परीक्षण समितीची (Pay review Committee) दिनांक २४ ऑगष्ट, १९९४ रोजी नेमणुक केली. समितीने आपला अहवाल २८ मे, १९९७ रोजी सादर केला. त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारशीसह अहवाल केंद्र शासनाकडे डिसेंबर, १९९७ मध्ये सादर केला. दुर्देवाने केंद्र शासनाने त्यामध्ये काही विपरीत बदल करुन सुधारित वेतन श्रेणी लागू करण्याबाबत एकतर्फी घोषणा दिनांक २४/४/१९९८ रोजी वृत्तपत्र प्रसारणाचे माध्यमातून व २७ जुलै,१९९८ ला अधिसूचना प्रसृत करुन केली. अखिल भारतीय प्राध्यापक महासंघाने (आयफुक्टो) सादर केलेल्या ३६ मागण्यांच्या मागणी पत्रकाचा विचार न केल्यामुळे महासंघाने ११ ऑगष्ट, १९९८ पासून बेमुदत संपाची घोषणा केली. केंद्र सरकारची आयफुक्टोशी बोलणी होऊन दिनांक ६ सप्टेंबर, १९९८ पासून बेमुदत संप मागे घेण्यात आला. पण त्यानंतर महाराष्ट्र शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्यामुळे ११ डिसेंबर, १९९८ ला महाराष्ट्रात सामुहिक रजा आंदोलन करण्यात आले. महोदय, केंद्राचे एक पैशाचेही अर्थ सहाय्य नसतांना महाराष्ट्र शासनाने २० लाख सरकारी व निमसरकारी कर्मचा-यांचे बाबतीत पाचव्या वेतन आयोगाने शिफारस केलेली वेतन श्रेणी लागू करण्याचा महाराष्ट्र शासन निर्णय निर्गमित झाला. तथापि प्राध्यापकांचे बाबतीत मात्र ७२० कोटी रुपयांचे (८० टक्के) अर्थसहाय्य केंद्रशासनाकडून मिळत असून सुध्दा सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याचे बाबतीत निर्णय घेण्यास टाळाटाळ होत होती. परिणामतः महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला ७ जुलै, १९९९ ला बेमुदत संपाचा निर्णय घ्यावा लागला. तथापि निवडणूका जाहीर झाल्यामुळे आचार संहिता लागू करण्यात आली त्यामुळे बेमुदत संपाचा निर्णय एमफुक्टोला स्थगित ठेवावा लागला. सुधारित वेतन श्रेणी लागू करणारे, केंद्राचे सुधारित निर्णय निघाल्यानंतर ११ महिन्याचा कालावधी झाल्यावरही महाराष्ट्र शासन मात्र प्राध्यापकांच्या बाबतीत उदासिनच होते. त्यामुळे एमफुक्टोला २० ऑक्टोबर, १९९९ ला महाराष्ट्रभर निदर्शने आयोजित करावी लागली व ८ डिसेंबर, १९९९ पासून बेमुदत संप करण्याची सूचना शासनाला देण्यात आली.

महोदय, मा. दिलीपराव वळसे पाटील, उच्चशिक्षण मंत्री झाल्यानंतर दिनांक १० नोव्हेंबर १९९९ रोजी एमफुक्टोने निवेदन पाठवून घटनाक्रमाची व आंदोलनाची माहिती देऊन चर्चेसाठी भेटीची वेळ द्यावी अशी विनंती त्यांना करण्यात आलेली होती. मा. दिलीपराव वळसे पाटील, यांचे कडून आमच्या निवेदनाला त्वरित योग्य प्रतिसाद मिळाला व १५ नोव्हेंबर, १९९९ रोजी दुपारी ३.३० वाजता एमफुक्टोच्या प्रतिनिधींशी त्यांनी चर्चा केली. मा. दिलीपराव

# महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रक्रियेमध्ये दरवेळी होत असलेला विलंब

*महाराष्ट्र विधानपरिषद : सोमवार, दिनांक २९ डिसेंबर २००८ : तिसरे अधिवेशन २००८*

महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रक्रियेमध्ये दरवेळी होत असलेला विलंब याबाबत **प्रा. बी.टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे, वि. प. स.** यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना पुढील प्रमाणे. :-

ज्याअर्थी, केन्द्र शासनाच्या मानव संसाधन विभागाच्या राज्यमंत्री यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यासंदर्भात दिनांक १६ डिसेंबर २००८ रोजी लोकसभेत निवेदन केले असून केंद्रीय मंत्रिमंडळाने, विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेली सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यासंदर्भातील सारे तपशील त्या अधिकृत निवेदनामध्ये उपलब्ध झालेले आहेत, आणि;

ज्याअर्थी "विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेली व केंद्र शासनाने संमत केलेली सुधारित वेतन श्रेणी महाराष्ट्रातील महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना ताबडतोबीने लागू करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत" या विषयावर दिनांक २० डिसेंबर २००८ रोजी किंवा त्या दरम्यान महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या (MFUCTO) महासचिवांनी मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना नागपूर मुक्कामी एक निवेदन सादर करुन ही बाब त्यांच्या लक्षात आणून दिलेली आहे व त्या निवेदनासोबतच केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर प्रसृत करण्यात आलेल्या मा. केंद्रिय राज्यमंत्र्यांच्या १६ डिसेंबर २००८ रोजीच्या निवेदनाची अधिकृत प्रत सहपत्र म्हणून जोडली आहे, आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनातील इतर कोणत्याही प्रवर्गांना वेतनसुधारणेसाठी केंद्र शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळत नाही, मात्र विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या बाबतीत केन्द्र शासनाकडून अतिरिक्त भाराच्या ८० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध होते. "महाराष्ट्रामध्ये २० लाख सरकारी व निमसरकारी कर्मचारी व शिक्षक यांच्या वेतन पुर्नरचनेचा शासन निर्णय निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवत असतांना त्याच वेळी महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन श्रेणीचे शासन निर्णय निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव सुध्दा मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात यावेत" अशी मागणीसुध्दा महासंघाच्या महासचिवांनी उपरोक्त निवेदनातून मा. उच्च शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे, आणि;

ज्याअर्थी "राज्यस्तरावरील प्राध्यापकांची संघटना म्हणून याबाबतीत एमफुक्टोला यापूर्वी १९८६ व १९९६ च्या सुधारित वेतनश्रेणी लागू होत असतांना आलेले अनुभव हे निश्चितपणे चांगले नाहीत. या मागणीसाठी त्यावेळी महाराष्ट्रातील प्राध्यापकांना निदर्शने, निषेध-दिन, सामुहिक रजा आंदोलन, बेमुदत संप इत्यादींचा अवलंब करावा लागला" असेही त्या निवेदनात महासचिवांनी नमुद केले आहे आणि;

ज्याअर्थी "**सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतन सुधारणापूर्व अग्रिम अदा करण्याबाबत**" या विषयावरील शासन निर्णय दिनांक ६ ऑक्टोबर २००८ रोजी शासनाने निर्गमित करुन इतर सर्व प्रवर्गांच्या समकक्ष वागणूक विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना दिली. "इंटेरिम रिलिफ किंवा सुधारणापूर्व अग्रिम अदा करण्याबाबत" महाराष्ट्राच्या इतिहासात हे पहिल्यांदाच घडले व दिनांक ८ ऑक्टोबर २००८ रोजी उच्च शिक्षण संचालक यांनी फॅक्स संदेशाद्वारे माहिती मागवून अग्रिम अदा करण्याची कारवाई पार पाडली, **हे खरे असले तरी वेतन सुधारणेच्या इतर प्रस्तावासोबत आपले प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवले जात नाहीत, ८० टक्के केंद्राचे अर्थसहाय्य मिळत असतांना ती प्रक्रिया अनेक महिन्याच्या विलंबाने सुरु केली जाते,** या भावनेने विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला आहे.

त्याअर्थी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करीत आहे.

**श्री. सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्रशिक्षण राज्यमंत्री )** : सभापती महोदय, प्रा. बी. टी. देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे, यांनी "महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रक्रियेमध्ये होत असलेला विलंब" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**श्री. राजेश टोपे, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन**

भारत सरकारने ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी केंद्रीय सेवेतील कर्मचाऱ्यांना लागू केल्यानंतर राज्यात ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी स्विकारण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय, वित्त विभाग, दिनांक २३ सप्टेंबर, २००८ अन्वये श्री.पी.एम.ई. हकीम सेवानिवृत्त सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती स्थापन करण्यात आलेली आहे. या समितीने सर्व संबंधित संघटनांकडून त्यांची निवेदने आमंत्रित करून गरजेनुसार त्यातील सुनावणी घेऊन कार्यवाही सुरू केली आहे. **वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ६.१०.२००८ अन्वये ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतन सुधारणापूर्व अग्रिम राज्यातील सर्व विद्यापीठाच्या व संलग्नीत अशासकीय**

---

वळसे पाटील यांनी या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेवून ७ डिसेंबर, १९९९ ला एमफुक्टो प्रतिनिधीना चर्चेसाठी वेळ दिली. ७ डिसेंबर, १९९९ ला तत्कालीन मा.उच्च शिक्षण मंत्र्याशी चर्चा झाली व निर्णय होऊन लेखी समझोता करण्यात आला. हा प्रश्न निकाली काढण्यामध्ये मा. दिलीपराव वळसे पाटील यांच्या व्यक्तीमत्वाचा व निर्णयशक्तीचा प्रथमतःच संघटनेस परिचय झाला. मा. दिलीपराव वळसे पाटील यांची प्रकृती बरी नसतांनाही रात्री उशिरापर्यत बसून त्यांनी निर्णय घेण्यामध्ये आपल्या सकारात्मक भूमिकेचा परिचय दिला. त्याबद्दल एमफुक्टो कार्यकारीणीने त्याचवेळी त्यांचे मनापासून अभिनंदन केले.

(५) महोदय, आपणांस या निवेदनाव्दारे खालीलप्रमाणे विनंती करण्यात येत आहे :-

i) संदर्भात नमूद केलेल्या निवेदनाची अंमलबजावणी करणारा केन्द्र शासनाचा शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून साधारणपणे एक महिन्याच्या आत महाराष्ट्रामधील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या संदर्भात सुधारित वेतन श्रेणीचा शासन निर्णय निर्गमित होईल याची योग्य ती काळजी घेण्याच्या सूचना विभागाला देण्यात याव्यात ; आणखी असे की,

ii) महाराष्ट्रामध्ये २० लाख सरकारी व निमसरकारी कर्मचारी व शिक्षक यांच्या वेतन पुनर्रचनेचा शासन निर्णय (ज्याबद्दल केन्द्र शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य उपलब्ध होत नाही) निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवत असतांना त्याच वेळी महाराष्ट्रामधील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन श्रेणीचे शासन निर्णय (ज्या बद्दल केन्द्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध होते) निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव सुध्दा मंत्रीमंडळासमोर ठेवण्यात येतील याची योग्य ती काळजी घेण्याच्या सुचना विभागाला देण्यात याव्यात.

धन्यवाद !

नागपूर **(डॉ. एकनाथ कठाळे)**

**महासचिव, एमफक्टो**

**सहपत्र** :- संदर्भात नमुद केलेल्या निवेदनाची प्रत सोबत जोडली आहे.

**प्रतिलिपी** :- माहिती करिता व आवश्यक कार्यवाहीकरिता सादर (१) मा. सचिव, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, कॅम्प - नागपूर (२) प्रा.बी.टी. देशमुख, विधानपरिषद सदस्य, कॅम्प, नागपूर

(डॉ.एकनाथ कठाळे) महासचिव, एमफक्टो

### महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रक्रियेमध्ये दरवेळी होत असलेला विलंब

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २००८*
*सोमवार, दिनांक २२ डिसेंबर २००८*

**सभापती.........**यानंतर सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे यांनी केंद्र शासनाच्या मानव संसाधन विभागाच्या राज्यमंत्र्यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भात विद्यापीठ आयोगाने शिफारस केलेली व केंद्र शासनाने संमत केलेली सुधारित वेतनश्रेणी राज्यातही लागू करणे या विषयावर नियम ९३ अन्वये सूचना दिली आहे. तो नियम ९३ चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र **या विषयावर शासनाने निवेदन करावे.**

**अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना अदा करण्यात आलेला आहे.**

विद्यापीठ अनुदान आयोगाने शिक्षकांच्या वेतनात सुधारणा करण्यासाठी प्रो.जी.के.चढ्ढा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. शिफारशींच्या **अनुषंगाने मनुष्यबळ विकास मंत्रालयाकडून शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत वेतनश्रेण्या लागू करण्याच्या आदेशाची प्रतिक्षा आहे.**

पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींतील वेतनश्रेण्या राज्य शासनाने स्विकारल्यानंतर त्या अनुषंगाने दिनांक १० डिसेंबर, १९९८ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या वित्त विभागाच्या अधिसूचनेनुसार शिक्षकेत्तर पदांना पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत वेतनश्रेण्या राज्यातील शिक्षकांना दिनांक ११.१२.१९९९ पासून लागू करण्यात आलेल्या आहेत. ही या प्रकरणाची वस्तुस्थिती आहे.

भारत सरकारने महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या सुधारित वेतनश्रेण्या **लागू करण्याच्या अनुषंगाने महासचिव, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २०.१२.२००८ रोजी शासनास सादर केलेल्या निवेदनातील मागणी अनुषंगाने वित्त विभागास प्रस्ताव सादर करण्यात येईल. ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी एकाच वेळी लागू करण्याबाबत शासन प्रयत्नशील राहील.**

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, केंद्रीय मंत्रिमंडळाने १५ डिसेंबर, २००८ रोजी हा निर्णय घेतला आणि दिनांक १६ डिसेंबर, २००८ रोजी लोकसभेमध्ये एच.आर.डी. विभागाच्या माननीय राज्यमंत्र्यांनी निवेदन केले. वेतन पुनर्रचनेच्या संदर्भात इतर कोणत्याही वर्गाबाबतीत केंद्र शासनाचे सहाय्य मिळत नाही परंतु या ठिकाणी जो अतिरिक्त आर्थिक भार येईल त्याच्या ८० टक्के सहाय्य केंद्र शासनाने देण्याचे मान्य केलेले आहे. त्याचा जी.आर. आलेला नाही हे खरे आहे परंतु माननीय केंद्रिय राज्यमंत्र्यांच्या निवेदनाची अधिकृत प्रत लोकसभेच्या आणि केंद्राच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे आणि महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या महासचिवांनी शासनाकडे ती प्रत पुरविलेली आहे. यापूर्वी १९८६ व १९९६ मध्ये ८० टक्के अर्थसहाय्य मिळत असूनही दोन दोन वर्षे उशिराने या वर्गाच्या बाबतीत हे निर्णय घेण्यात आले. मागच्या वेळी १९८६ व १९९६ मध्ये तर इंटेरिम रिलिफ देताना तो प्राध्यापक आणि कोतवाल यांना सुरुवातीला दिलेला नव्हता. **यावेळी इंटेरिम रिलिफ किंवा सुधारणापूर्व अग्रिम दिलेला आहे.** हे केंद्राच्या राज्यमंत्र्यांचे १४ परिच्छेद असलेले लोकसभेतील अधिकृत निवेदन आहे. यापोटी अंदाजे १ हजार ते २ हजार कोटी रुपयांचे अर्थसहाय्य आपल्याला मिळणार आहे. या निवेदनाची अधिकृत प्रत आपल्याला मिळाली आहे काय ? जर मिळाली असेल तर त्याबाबतचे प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरु करावे आणि केंद्राचा याबाबतचा शासन निर्णय आल्यावर इतर सर्व कर्मचाऱ्यांच्या सोबत हे प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवावे. या निवेदनामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी एकाच वेळी लागू करण्याबाबत शासन प्रयत्नशील राहील. माझा प्रश्न असा आहे की, लोकसभेच्या राज्यमंत्र्याचे हे अधिकृत निवेदन जे दोन्ही वेबसाईटवर उपलब्ध आहे ते शासनाला मिळाले आहे, हे खरे आहे काय ? हे प्रस्ताव तयार करण्याची प्रक्रिया सुरु करावी असे आदेश दिले जातील काय ? शासकीय कर्मचाऱ्यांबरोबरच हे प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवले जातील काय ?

**श्री. सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, **सहाव्या वेतन आयोगासंबंधी एच.आर.डी. मंत्रालयाने महाविद्यालयीन शिक्षक तसेच विद्यापीठीय शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या संदर्भात प्रो. जी. के. चढ्ढा यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. त्या समितीचा रिपोर्ट अजून एच.आर.डी. मंत्रालयाला सादर झालेला नाही.** त्यांचा रिपोर्ट आल्यानंतर एच.आर.डी. मंत्रालय आणि यु.जी.सी. जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील. वेतन आयोगाच्या ज्या शिफारशी आहेत त्याबाबत सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांबाबत ज्यावेळी महाराष्ट्र शासन निर्णय घेईल त्यावेळी शिक्षक आणि उच्च शिक्षण विभागातील जे कर्मचारी आहेत यांचेही त्यांच्याबरोबर करुन घेऊ.

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना १०० टक्के चुकीची माहिती देण्यात आलेली आहे. प्रो. चढ्ढा समितीचा रिपोर्ट सादर झालेला नाही हे म्हणणे १०० टक्के चुकीचे आहे. कारण लोकसभेमध्ये माननीय राज्यमंत्र्यांनी जे निवेदन केले आहे त्याची प्रत माझ्याजवळ आहे. त्याची प्रत माननीय मंत्रिमहोदयांजवळ सुध्दा आहे. निवेदनामध्येच स्पष्टपणे असे म्हटले आहे की, "चढ्ढा समितीच्या रिपोर्टवर केंद्रिय मंत्रिमंडळाने १५ डिसेंबर, २००८ च्या बैठकीमध्ये निर्णय घेतला असून हा निर्णय मी आता जाहीर करीत आहे." ते निवेदन मिळाले नाही असे आपण सांगितले. अधिकारी चुकीची माहिती देतात त्यामुळे कारण नसतांना सभागृहातील चर्चा वाढते. या निवेदनामध्ये स्पष्टपणे ती गोष्ट मान्य केलेली आहे. खरे म्हणजे माझा प्रश्न पुढे जाण्याच्या ऐवजी मागे आला. प्रो. चढ्ढा समितीचा रिपोर्ट सादर झालेला आहे आणि त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय झाला व त्यानंतर आता केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णय सुध्दा १५ डिसेंबर रोजी झालेला आहे. यासंदर्भात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी माननीय उच्च शिक्षण मंत्र्यांना दि.२० डिसेंबर, २००८ रोजी निवेदन दिलेले आहे. ते यांना मिळालेले आहे. या निवेदनासोबतच केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर प्रसृत करण्यात आलेल्या माननीय केंद्रीय राज्यमंत्र्यांनी लोकसभेत निवेदन केलेले सहपत्र म्हणून जोडलेले आहे. जे केंद्र शासनाचे ऑफिशिअल टेक्स्ट आहे.

**श्री.सुरेश शेट्टी :** सभापती महोदय, चढ्ढा कमिटीचा अहवाल सादर झाला असला तरी एचआरडी किंवा युजीसीकडून राज्य सरकारकडे अजून काही माहिती आलेली नाही. त्यांच्याकडून एकदा सरकारला पत्र आल्यानंतर हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवला जाईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** शासनाने चढ्ढा समितीचा अहवाल किती तरी दिवसापूर्वी सादर झाल्याचे मान्य केले आहे. चढ्ढा समितीचा अहवाल सादर झाल्यानंतर युजीसीचा अहवाल सादर झालेला आहे. त्यानंतर सचिव समितीचा अहवाल सादर झाला आहे. ही सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आणि त्याबाबत लोकसभेत ऑफिशिअली स्टेटमेंट करण्यात आलेले आहे. त्या निवेदनाची प्रत शासनाला मिळालेली आहे, कारण तसे या निवेदनात मान्य केलेले आहे. त्याची प्रत सोबत जोडलेली आहे. याबाबत जी.आर.निघाला नाही हे म्हणणे बरोबर आहे. लोकसभेत केंद्रीय राज्यमंत्र्यांनी दिनांक १६ डिसेंबर, २००८ रोजी निवेदन केलेले आहे. त्यामध्ये "राज्य सरकारला ८० टक्के अर्थसहाय्य देण्यात येईल" असे परिच्छेद १२ मध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे. ही वस्तुस्थिती असताना विभागाचे अधिकारी मंत्री महोदयांना माहिती देत नसतील तर ते अयोग्य आहे. याबाबतचा जी.आर.निघावयाचा आहे तो जेव्हा निघेल तेव्हा निघेल. परंतु मंत्रिमहोदयांकडे केंद्राचे अधिकृत निवेदन आलेले आहे की नाही या प्रश्नाचे मला उत्तर पाहिजे. तसेच हे प्रस्ताव शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रस्तावासोबत एकाचवेळी मंत्रिमंडळासमोर ठेवले जातील किंवा नाही ?

**श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मला मिळालेल्या माहितीनुसार अजून त्या विभागाची शिफारस सादर झालेली नाही. युजीसीकडून शिफारस आल्यानंतर, केंद्र सरकारकडून आदेश दिले जातील त्या आदेशांचे पालन केले जाईल.** या लोकांना लवकरात लवकर सहावा वेतन आयोग मंजूर करावा असा सन्माननीय सदस्यांचा मूळ मुद्दा आहे. गेल्या वेळेला पाचवा वेतन आयोग मंजूर करण्यात विलंब झाला होता हे खरे आहे. पण सहावा वेतन लागू करण्यापूर्वी शासनाने दिवाळीला सर्व कर्मचाऱ्यांना कमीत कमी १० हजार व जास्तीत जास्त दोन मूळ वेतन इतका अग्रिम दिलेला आहे. असा निर्णय घेणारे हे एकमेव राज्य आहे. या शासनाने चांगले काम केलेले आहे. यासंदर्भात एचआरडी व युजीसीकडून शिफारस आल्यानंतर ती मंत्रिमंडळासमोर ठेवली जाईल. **शासनाचे जेवढे शासकीय कर्मचारी, अधिकारी आहेत त्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घ्यावा लागेल तेव्हा या विभागाचा प्रस्ताव एकत्रित करुन त्यावर विचार केला जाईल.**

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मी या निवेदनातील शेवटच्या परिच्छेदाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो. दिनांक २०.१२.२००८ रोजी शासनाला हे निवेदन प्राप्त झालेले आहे. या निवेदनाच्या सोबत केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर केंद्रीय राज्यमंत्र्यांनी केलेले निवेदन उपलब्ध आहे, जे ऑफिशिअल टेक्स्ट आहे. ही गोष्ट खरी असल्यामुळे मी ते विचारत नाही. कारण त्याची प्रत शासनाला प्राप्त झालेली आहे. अधिकारी एवढे बेजबाबदारपणे मंत्री महोदयांना माहिती देत असतील तर ते गैर आहे. आता मंत्रिमहोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे. शासनाला दि.२०.१२.२००८ रोजी महासंघाचे निवेदन मिळाले आहे असे उत्तर दिलेले आहे. त्याची प्रत माझ्यासमोर व आपल्यासमोर आहे. त्यामुळे शासनाने अशी चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. ती करण्यात येईल काय ?

**श्री.सुरेश शेट्टी :** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांनी शासनाला निवेदन दिलेले आहे हे खरे आहे. परंतु यासंदर्भात युजीसीकडून किंवा केंद्र सरकारकडून डायरेक्टीव्हज् आल्या पाहिजेत. कोणी तरी निवेदनात केंद्र सरकारच्या निर्णयाचा रेफरंस देऊन मागणी मंजूर करण्याचा सरकारकडे आग्रह धरु लागले तर ते योग्य होणार नाही. शासनाला प्रॉपर चॅनेलने जावे लागते.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.भास्कर जाधव )**

**प्रा. बी.टी.देशमुख :** त्यांनी असे म्हटलेले आहे की, ऑफिशियल वेबसाईटवरुन निवदेन घेतलेले आहे. मला याबाबतीत वाद घालावयाचा नाही. माननीय मंत्री महोदयांनी सुरुवातीला केंद्रीय राज्यमंत्र्यांचे निवेदन आलेले नाही असे उत्तर दिले. तेव्हा ते निवेदन झाले असतांना चुकीची माहिती कोणी दिली याची चौकशी करावी. तोंडी आणि लेखी उत्तरामध्ये फरक पडता कामा नये. ती चौकशी करण्यात येईल काय ?

**श्री. सुरेश शेट्टी :** ठीक आहे.

*****

# सन १९९१ ते १९९९ या कालखंडात व त्यानंतर सुध्दा नेमणुका झालेल्या अधिव्याख्यात्यांना नेट-सेटच्या पात्रतेपासून मुक्तता देण्याचा घेतलेला निर्णय

*महाराष्ट्र विधानपरिषद :* *बुधवार, दिनांक १७ डिसेंबर २००८* *: तिसरे अधिवेशन, २००८*

*सन १९९१ ते १९९९ या कालखंडात व त्यानंतरसुध्दा नेमणुका झालेल्या अधिव्याख्यात्यांना नेट-सेटच्या पात्रतेपासून मुक्तता देण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.*

**प्रा.बी.टी.देशमुख** ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सन १९९१ ते १९९९ या कालखंडामध्ये महाराष्ट्रात नेट-सेटची पात्रता कायद्याने लागू केलेली नसल्याने त्यावेळच्या पात्रतेनुसार झालेल्या नेमणुका या बेकायदेशीर नसून त्या अधिव्याख्यात्यांना ५ वर्षाची सेवा झालेली असल्यास नेट-सेटच्या पात्रतेपासून मुक्तता देण्याचा धोरणात्मक निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समितीने आपल्या दिनांक ३ व ४ सप्टेंबर, २००८ च्या बैठकीत घेणे, विद्यापीठ अनुदान आयोगाने आपल्या दिनांक ७ व ८ ऑक्टोबर, २००८ च्या बैठकीत तसा धोरणात्मक निर्णय घेऊन त्यानुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील अशा ६३७ शिक्षकांच्या बाबतीत दिनांक ५ नोव्हेंबर, २००८ च्या एका पत्रान्वये (No. F-1/2008 (PS)) विद्यापीठाला कळविणे, दिनांक २७ नोव्हेंबर, २००८ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाने Writ Petition Nos. 4266/2006, 5037/08, 4486/2007, 4386/07, 4500/07 and 462/2008 या प्रकरणी दिनांक ५ नोव्हेंबर, २००८ च्या पत्राचा उल्लेख करुन समान प्रकरणी समान निर्णय घेण्याचा दिलेला निर्णय, गेले अनेक वर्षे पडून असलेल्या या प्रश्नाबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने धोरणात्मक निर्णय घेतल्यानंतर सुध्दा अशा शिक्षकांच्या स्थाननिश्चितीच्या बाबतीत शासनाकडून शासननिर्णय निर्गमित न झाल्यामुळे या शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**श्री.राजेश टोपे** ( उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन**

दिनांक १९ सप्टेंबर, १९९१ च्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिसूचनेनुसार नेट/सेट पात्रता परीक्षा अनिवार्य करण्यात आली होती. परंतु नेट/सेट पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे शासनाकडून वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार अधिव्याख्यात्यांना तदर्थ स्वरुपात मान्यता देण्यात येत होती. दरम्यान शासनाद्वारे दिनांक २२.१२.१९९५ च्या शासन निर्णयानुसार विहीत निवड समितीने शिफारस केलेल्या परंतु नेट/सेट पात्रता नसलेल्या शिक्षकांना तदर्थ स्वरुपात मान्यता देण्यात येत होती. नेट/सेट नसलेल्या अशा सर्व शिक्षकांचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाकडे नेट/सेट पात्रतेनुसार सुट मिळण्यासाठी वर्ष २००४ मध्ये पाठविण्यात आले होते. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना दिनांक ११ जुलै, २००७ रोजी पाठविलेल्या पत्रानुसार,

अ) आचार्य पदवी प्राप्त झालेले अधिव्याख्याते,

ब) एम.फिल. परीक्षा उत्तीर्ण असलेले अधिव्याख्याते व

क) वरील दोन्ही परीक्षा उत्तीर्ण न झालेले अधिव्याख्यात्यांची माहिती मागविली होती.

ही माहिती विद्यापीठ अनुदान आयोगाला दिनांक २१ जुन, २००८ रोजी पाठविण्यात आली होती. त्यावर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ५ नोव्हेंबर, २००८ च्या पत्रात नमूद केलेल्या खालील अटीनुसार एकूण ८३७ शिक्षकांना नेट/सेट पात्रतेपासुन सुट देण्यात येत असल्याचे विद्यापीठांस कळविले आहे.

1) That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee.

2) The constitutional provision of reservation for SC/ST etc. are followed in these selections.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे हे पत्र विद्यापीठास नुकतेच प्राप्त झाले असून विद्यापीठ स्तरावर आयोगाने केलेल्या वरील सुचनेप्रमाणे शिक्षक नियमित निवड समितीद्वारे नियुक्त झाले आहे किंवा कसे या बाबी तपासल्या जातील. अधिव्याख्यात्यांना नेट/सेट परीक्षेतून सूट देण्याच्या संदर्भात वरील अटीच्या अनुषंगाने तपासणी करुन नेट/सेट मधून सूट प्राप्त झालेल्या अधिव्याख्यात्यांची **तदर्थ मान्यता नियमित करण्याची कार्यवाही विद्यापीठामार्फत करण्यात येईल. ही कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या करीअर ॲडव्हांसमेंट स्किमनुसार संबंधीत अधिव्याख्यात्यांना स्थाननिश्चिती देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.**

ज्यांची प्रकरणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक ५ नोव्हेंबर, २००८ च्या प्रमाणे पात्र होत नाही अशा संबंधितांनी विद्यापीठामार्फत विद्यापीठ अनुदान आयोगाकडे प्रकरणे सादर केल्यावर दिनांक १२ नोव्हेंबर, २००८ च्या केंद्र शासनाच्या आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत कार्यवाही अपेक्षित आहे.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, याठिकाणी जे निवेदन करण्यात आलेले आहे त्याबाबत मी सुरुवातीलाच मनापासून समाधान व्यक्त करतो. दिनांक २२.१२.१९९५ च्या शासन निर्णयानुसार **तदर्थ स्वरुपात मान्यता देण्यात आल्या होत्या असे निवेदनात म्हटले आहे. ही गोष्ट खरी आहे मात्र ही अट दिनांक १८ ऑक्टोबर २००१ च्या शासन निर्णयाने रद्द करण्यात आलेली आहे याचा उल्लेख निवेदनात नाही. ही एक गोष्ट लक्षात आणून देऊ इच्छितो.** दिनांक १८ ऑक्टोबर, २००१ च्या शासन निर्णयात स्पष्ट म्हटले आहे की, "दिनांक २२.१२.१९९५ रोजी जे आदेश काढण्यात आलेले आहेत ते रद्द करण्यात येत आहेत." "दिनांक १९.९.१९९१ ते ११.१२.१९९९ या कालावधीत त्यावेळच्या निवड समितीमार्फत नियुक्त झालेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा खंडीत होणार नाहीत" असे स्पष्ट म्हटले आहे. या बाबतीत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झालेला आहे. या संदर्भात तत्कालीन माननीय मंत्रिमहोदय श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी उत्तर दिले होते. ते मी वाचून दाखवित नाही. परंतु त्यातील काही तपशील मी रेकॉर्डवर घेऊ इच्छितो. मंगळवार, **दिनांक ११ डिसेंबर २००१ रोजीचा ता.प्र.क्र.१९५२१ क्रमांकाचे उत्तर आहे. या रेग्युलेशनचे स्वरुप काय आहे हे सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केले ते त्यामध्ये आलेले आहे ते मंत्रिमहोदयांनी पहावे. ही दुसरी गोष्टी.** १९९१ ते १९९९ पर्यंतच्या अधिव्याख्याता म्हणून नियुक्ती झालेल्यांना महाराष्ट्रात नेट-सेट कायद्याने बंधनकारक करण्यात आले नव्हते. प्राध्यापक पदासाठी पात्रता ठरविण्याचे तीन मार्ग आहेत. एक म्हणजे विद्यापीठाने स्टॅट्युट करणे, दुसरे म्हणजे त्याऐवजी व्हाईस चॅन्सलरचे डायरेक्टीव्हज किंवा तिसरे म्हणजे शासनाने स्टॅन्डर्ड कोड करणे, या तीनही गोष्टी १९९९ पर्यंत झालेल्या नव्हत्या. म्हणून १९९१ ते १९९९ च्या बाबतीत ज्या नागपूर विद्यापीठाचे प्रकरण आपल्यासमोर आहे त्या **नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांनी विद्यापीठ अनुदान आयोगाला स्पष्टपणे असे कळविले की, आमच्याकडे नेट-सेट बंधनकारक झालेले नव्हते त्यामुळे या नियुक्त्या झालेल्या आहेत व त्या नियमित आहेत.** दिनांक १७ डिसेंबर २००२ च्या पत्रान्वये नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांनी यु.जी.सी. ला असे कळविलेले होते की, "Since NET/SET was not inducted as a compulsory qualification at the recruitment level by legal instrument, hundreds of candidates without NET/SET, were recruited from 1991 till the cut-off date i.e. 28.12.1999 in this university area. Advertisements were approved, Selections were made, approvals were granted by the university and; because it was the perfectly lawful recruitment in the teaching cadre, 100 % salary grants were paid by the State Government in respect of such lawfully recruited teachers year after years and continued to be so paid even today."

त्या पत्रात स्पष्टपणे असे म्हटलेले होते की, या ॲडव्हॉक अपॉईन्टमेन्टस नसुन त्या रेग्युलर नेमणुका आहेत यु.जी.सी.च्या पत्राप्रमाणे आता आपण पुढील कार्यवाही करावी, त्यात काही चूक नाही परंतु १९९१ ते १९९९ या कालावधीत ज्यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत त्यांच्या नेमणूका रेग्युलर आहेत. पाहिजे तर आपण याबाबतीत विद्यापीठाला विचारुन घ्यावे

केवळ मी असे म्हणतो अशातला भाग नाही. **१९९९ नंतर ज्या नेमणुका करण्यात आल्या आहेत त्यांच्या नेमणुका विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्णयाप्रमाणे रेग्युलराईज करुन घ्याव्या लागणार आहे.** मी माहितीसाठी या दोन तीन गोष्टींचा येथे उल्लेख केला आहे. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने मला माननीय मंत्री महोदयांना एक दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. त्यातील पहिला प्रश्न असा आहे की, या संदर्भात शासन निर्णय काढावा लागणार आहे. त्याशिवाय पुढे काम सरकत नाही. तेव्हा हा शासन निर्णय किती दिवसात काढला जाणार आहे ? सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात ही बाब असल्यामुळे अनेक कोर्ट कचेऱ्यांची प्रकरणे झालीत, कंटेम्प्टच्या केसेस झालेल्या आहेत. या संदर्भात आता यु.जी.सी ने निर्णय दिला आहे आणि त्या बाबतीत शासनाने योग्य कार्यवाही सुरु केलेली आहे. मला असे विचारावयाचे आहे की या संबंधीचा शासन निर्णय किती दिवसात काढण्यात येणार आहे? हे एक व त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, १९९१ ते १९९९ या कालावधीमध्ये रेग्युलर अपॉईन्टमेन्टस करण्यात आल्या होत्या त्या ॲडव्हॉक पध्दतीने करण्यात आलेल्या नव्हत्या परंतु १९९९ नंतर ज्यांच्या ॲडव्हॉक पध्दतीने अपॉईन्टमेन्टस केलेल्या आहेत. त्यांचे युजीसीच्या निर्णयाप्रमाणे रेग्युलरायझेशन करुन घ्यावे लागणार तेव्हा ही प्रोसेस किती दिवसात पार पाडण्यात येईल ? त्यानंतर माझा तिसरा प्रश्न असा आहे की, विद्यापीठाच्या प्लेसमेन्ट कमिटीची बैठक होऊन कॅसचे असेसमेन्ट होऊन **प्रत्यक्षात प्लेसमेन्ट होण्यासाठी किती वेळ लागेल याबाबतीत आपण टाईम बाऊन्ड कार्यक्रम सांगितला म्हणजे मग त्याप्रमाणे संबंधित अधिकारी कामास लागतील.** तेव्हा मी विचारलेल्या तीन प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत अशी मी त्यांना विनंती करतो.

**श्री.राजेश टोपे :** सभापती महोदय, सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी अधिव्याख्यात्यांच्या पदांच्या संदर्भात लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने प्रश्न विचारले आहेत. **अधिव्याख्यात्यांना नेट सेट ची परीक्षा १९९१ ला कम्पलसरी करण्यात आली होती परंतु लीगल इन्स्ट्रुमेन्टच्या माध्यमातून किंवा स्टॅटयूटमध्ये किंवा व्हाईस चॅन्सलरच्या डायरेक्शन्समध्ये किंवा गव्हर्नमेन्टच्या कोड मध्ये यासंबंधीचा उल्लेख न केल्यामुळे नेट सेटची परीक्षा कायद्याने लागू करता आली नाही** दरम्यानच्या काळात काही नेमणुका करण्यात आल्या होत्या. त्या नेमणुका ॲडव्हॉक म्हणजे तदर्थ स्वरुपाच्या होत्या. सभापती महोदय, राज्यामधील ६ हजार अधिव्याख्याता पदांच्या संदर्भात हा प्रश्न असून त्यापैकी नागपूर विद्यापीठातील ६३७ अधिव्याख्याता पदाच्या संदर्भातील हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात दरम्यानच्या काळात सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता आणि त्या निर्णयाच्या अनुषंगाने यु.जी.सी.ने नागपूर विद्यापीठाला पत्र पाठविले असून त्यामध्ये स्पष्ट उल्लेख करण्यात आला होता की, ज्यांच्या नेमणूका विद्यापीठाने नेमलेली जी समिती आहे त्या समितीच्या मार्फत केल्या आहेत किंवा कॉन्स्टिटयुशनल रिझर्व्हेशन योग्य प्रकारे पाळले जाऊन ज्याच्या नेमणूका केल्या आहेत किंवा ज्या अधिव्याख्यात्यांचा कार्यकाळ पाच वर्षाचा झाला असेल अशा अधिव्याख्यातांना नियमित करण्यात यावे. अशा प्रकारे यु.जी.सी.ने पत्र पाठविलेले आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यानी जे तीन प्रश्न विचारलेले आहे त्या बाबत मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, या सदंर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे **तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी आर काढण्यात येईल जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल.** आपला अधिवेशनाचा कालावधी त्या दरम्यानचा राहील असे वाटते तेव्हा हे अधिवेशन संपण्याच्या अगोदरचा हा जी आर काढण्यात येईल. त्याचबरोबर अधिव्याख्यात्यांना नियमित करण्याचे विद्यापीठाचे काम सुरु आहे. विद्यापीठाला सुध्दा सभागृहाच्या भावना कळविण्यात येतील तसेच **हे काम एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल.**

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या तिसऱ्या प्रश्नाला उत्तर देताना मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, यांचे स्थान निश्चिती करणे हा यातील महत्त्वाचा प्रश्न आहे आणि ते कॅसचे काम आहे आणि **हे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे त्यासाठीदेखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकारे हे एकूण सर्वच काम म्हणजे नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढे कॅसचे काम दोन महिन्यात असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल.**

**श्री. विक्रम काळे :** सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्र्यांनी जे उत्तर दिले आहे त्याबद्दल जरूर मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु त्याचबरोबर महाराष्ट्रातील इतर जी विद्यापीठे आहेत उदा. औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठांतर्गत तसेच नांदेडच्या स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापिठांतर्गत असे प्राध्यापकांचे प्रस्ताव युजीसीकडे पाठविण्यात आले होते आणि त्यांना देखील युजीसीने एक्झम्प्शन दिले आहे. परंतु त्या त्या विद्यापीठांनी आतापर्यंत त्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. तेव्हा आता जो निर्णय आपण दिला आहे तो निर्णय महाराष्ट्रात ज्यांना ज्यांना युजीसीने एक्झम्प्शन दिलेले आहे त्या सगळ्या प्राध्यापकांना आणि त्या सगळ्या विद्यापीठांना लागू राहणार आहे काय ?

**श्री. राजेश टोपे :** सभापती महोदय, मी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरातच सांगितले आहे की, सहा हजार अधिव्याख्यात्यांच्या पदांच्या बाबतीतील हा प्रश्न आहे. तेव्हा ज्या ज्या विद्यापीठांमध्ये हे प्रश्न आहेत, तदर्थ स्वरूपाची नेमणूक करण्यात आलेली आहे त्या सगळ्या विद्यापीठांना आता आम्ही नागपूर विद्यापीठाला ज्या सूचना देणार आहोत, .. **एक महिन्याच्या कालावधीत त्यांनी त्यांच्याकडील अधिव्याख्याते नियमित करण्याचे काम आणि त्यापुढील दोन महिन्याच्या कालखंडामध्ये कॅसचे काम म्हणजेच त्यांच्या स्थाननिश्चितीचे काम पूर्ण करण्याच्या सूचना आम्ही देणार आहोत त्याच इतर सगळ्या विद्यापीठांनाही देण्यात येतील.**

**प्रा. बी.टी. देशमुख :** सभापती महोदय, नामदार मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराने माझे समाधान झालेले आहे. मात्र त्यात मला एकच सांगावयाचे आहे की, ज्यांचे आपण रेग्युलरायझेशन करायचे त्यातील १९९१ ते १९९९ हा एक वेगळा भाग आहे. आपण त्या विद्यापीठाकडून त्याबाबत माहिती घ्या. ते जर **रेग्युलर असतील तर पुन्हा ते रेग्युलर करण्याचा प्रश्न येत नाही. पण रेग्युलर नसतील तर त्यांना तदर्थचे रेग्युलर करून घेण्याची प्रोसेस आपण पूर्ण करा अशा सूचना देऊन त्या विद्यापीठांकडून ९१ ते ९९ या काळातील त्यांच्याकडील नेमकी परिस्थिती काय आहे याची विचारणा त्यांच्याकडे करावी. ती आपण कराल काय?**

**श्री. राजेश टोपे : होय.**

*****

## (१३)

## हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुद्धा पदे अनारक्षित केल्याप्रकरणी योग्य तो लाभ देण्याची कारवाई न होणे

*महाराष्ट्र विधानपरिषद :* *: तिसरे अधिवेशन २००८*

***बुधवार, दिनांक १७ डिसेंबर २००८***

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर २००८ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक*

**(५५) * ४६१८५ प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री.दिदिलीपराव सोनवणे : तारांकित प्रश्न क्रमांक ४२१५३ ला दिनांक २१ जुलै, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुध्दा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघाच्या (नुटा) सहसचिवांनी दिनांक ३० मे,२००५ रोजी किंवा त्या दरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवदेनात नमूद असलेल्या प्रस्तावा संदर्भात पदे अनारक्षित करुन संबंधितांना सेवा सातत्याचे लाभ लागू करणाच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, वेतनवाढी, वरिष्ठ श्रेणी व निवडश्रेणीच्या थकबाकीपोटी अदा करावयाच्या प्रत्यक्ष रक्कमा संबंधितांना केंव्हा अदा करण्यात आलेल्या आहेत,

(३) उक्त प्रकरणी अद्याप कारवाई केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) होय.

(२) पदे बिनराखीव केल्यानंतर थकबाकी देय असलेल्या पाच अधिव्याख्यात्यांपैकी दोन अधिव्याख्यात्यांना दिनांक २२-१०-२००८ व दिनांक ३१-७-२००८ रोजी वेतवाढीच्या थकबाकीच्या रकमा अदा करण्यात आल्या आहेत. दोन अधिव्याख्यात्यांना वेतनवाढीच्या फरकाची रक्कम अनुज्ञेय नाही व उर्वरित एका अधिव्याख्यात्यांच्या वेतनवाढीच्या थकबाकीची रक्कम माहे डिसेंबर २००८ च्या नियमित वेतनाच्या वेळी अदा करण्यात येणार आहे. पाचही अधिव्याख्यात्यांना वरिष्ठ श्रेणीच्या थकबाकीच्या रकमा दि. ४-७-२००८, ४-७-२००८, ५-१०-२००५, १३-८-२००७, १६-४-२००२ रोजी अदा करण्यात आल्या आहेत. तसेच निवडश्रेणीच्या थकबाकीच्या रकमा दि. ४-७-२००८, ४-७-२००८, २८-८-२००८, १५-९-२००८ व १२-७-२००८ रोजी अदा करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

*****

*PR :- **(1)** S.Q. 5958 Dt. 150705 P 76 NB 05 **(2)** U.S.Q. 10109 Dt. 190406 P 114 NB 06 **(3)** U.S.Q. 17998 Dt. 151206 P 114 NB 06 **(4)** S.Q. 29726 Dt. 240707 P 83 NB 07 **(5)** S.Q. 38061 Dt. 140308 P 59 NB 08 **(6)** S.Q. 42160 Dt. 210708 P 93 NB 08 **(7)** S.Q. 46186 Dt. 171208 P 15 NB 09*

**MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)**

*Registered under the Trade Union Act 1926, Reg.No.By-II-8162 of 1985*

Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.

# सन १९९१ ते सन १९९९ या काळातील नेटसेटग्रस्त शिक्षकांच्याबाबतीत सम्मत झालेला ठराव

**as adopted at the EC Meeting on Sunday, 21st December 2008 at Mumbai**

**ज्याअर्थी** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्थायी समितीने दिनांक ३ व ४ सप्टेंबर २००८ च्या सभेमध्ये नेटसेटग्रस्त शिक्षकांच्या बाबतीत काही धोरणात्मक शिफारसी केलेल्या आहेत. त्यात "**With regard to the candidates who had not cleared the NET/SLET at the time of selection or appointment** and were otherwise found qualified and appointed against existing vacancies on the recommendation of the Selection Committee but were not appointed on a regular basis for lack of NET/SLET clearance and due to non approval from the concerned authorities, the **Committee was of the opinion that if the said appointees have been in continuous service for a period of five years, they will be recommended for exemption from NET/SLET. The Committee further finds that such appointments at the initial stage were only irregular, in the sense, that it is not illegal though the other requirements for regular appointment such as qualifications, selection procedure and existence of vacant posts etc. were duly met and therefore could be regularized.** The committee feels that their appointment was necessitated due to non availability of NET/SLET qualified candidates and their five years service is considered to be sufficient for regularizing their services." अशी एक महत्वपूर्ण शिफारस आहे आणि;

**ज्याअर्थी** या शिफारशींवर ७ व ८ ऑक्टोबर २००८ रोजीच्या बैठकीत विद्यापीठ अनुदान आयोगाने काही धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. ज्यात एक निर्णय पुढील प्रमाणे आहे :-

"With reference to your proposal on the above subject, I am directed to inform you that the matter was placed before the Commission at its meeting held on 7th & 8th October, 2008. **The Commission was of the view that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview and had continued service of 5 or more years the NET /SLET qualification is relaxed in respect of the following candidates for appointment as Lecturer with the following conditions :-**

(i) That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee.

(ii) The constitutional provisions of reservation for SC/ST etc. are followed in these selections." आणि;

**ज्याअर्थी** त्यानंतर उपरोक्त निर्णय अशा ६३७ शिक्षकांच्या बाबतीत नागपूर विद्यापीठाच्या कुलसचिवांना (त्याचप्रमाणे तत्सम शिक्षकांच्या बाबतीत इतर विद्यापीठांच्या कुलसचिवांना) दिनांक ५ नोव्हेंबर २००८ च्या पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने कळविला आहे; आणि;

**ज्याअर्थी** Writ Petition Nos. 4266/2006, 5037/08,4486/2007, 4386/07, 4500/07 and 462/2008 या प्रकरणात दिनांक २७ नोव्हेंबर, २००८ रोजी मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने

"**So far as the lecturers, who were in service, from 1991 onwards, the issue of exemption to them is claimed to be covered by the orders passed by the UGC on 5.11.2008 based on the Commission's decision in its meeting dated 7th and 8th October 2008.** If any of the petitioners are governed by this communication dated 5.11.2008 addressed by the UGC to the Registrar of the University concerned, **undoubtedly, their proposals will have to be considered and approved, as per the said decision of UGC** and also the decision of the Government of India, if any, subsequently taken and applicable to the teacher appointed between the years 1991 to 2006." असा निर्णय दिलेला आहे व याच निर्णयात पुढे असेही म्हटले आहे की, :-

"**Hence, the relief prayed for by the petitioners who are not similarly placed will have to be in accordance with the Government of India order dated 12.11.2008** ...... **The petitioners, therefore, will have to approach the University concerned, which in turn may submit its report of University Grants Commission,** which will consider such proposals, in keeping with the order passed by the Union of India on 12.11.2008. Hence, the petitions are disposed off with liberty as is available in law."

**त्याअर्थी** १९९१ ते १९९९ या काळात नेमणूका झालेल्या नेट-सेट ग्रस्त शिक्षकांची प्रकरणे, यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविली नसल्यास, ती महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठाकडून Relaxation/Exemption करिता विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्याची प्रक्रिया तत्परतेने पूर्ण करण्यात यावी, **असा ठराव करण्यात येत आहे.** सन २००० ते २००६ या काळातील अशी प्रकरणे सुद्धा विद्यापीठामार्फत विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्यात यावीत.

**असेहि ठरविण्यात येत आहे की,** पुढे येणाऱ्या अथवा येवू शकणाऱ्या अडचणी लक्षात घेता, महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने आपल्या दिनांक १७ ऑगस्ट २००८ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपिठासमोर दाखल झालेली विविध प्रकरणे मागे घेण्यात येऊ नयेत. नुकत्याच घडलेल्या घटना व अद्यावत माहितीच्या आधारावर सादर करण्यात आलेल्या याचिकांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात किंवा यथास्थिती सुधारित याचिका दाखल करण्यात याव्यात.

सन १९९१ ते १९९९ या काळात सेवेत भरती झालेल्या काही अधिव्याख्यात्यांना काही दिवसापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे दोन वर्षासाठी 'एक्झम्शन' देण्यात आले तर १९९९ नंतर नेमणूका झालेल्या अनेक शिक्षकांना 'कायम स्वरुपी एक्झम्शन' देण्यात आले. या भेदभावाविरोधात संबंधित शिक्षकांतर्फे अथवा शिक्षकांच्या समूहातर्फे याचिका दाखल कराव्यात, अशा याचिका दाखल करतांना मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक २७ नोव्हेंबर २००८ रोजी दिलेल्या उपरोल्लोखित निर्णयाचा संदर्भ न चुकता द्यावा, अशा याचिकेमध्ये राज्यशासनाला प्रतिवादी करावे व वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी मध्ये स्थाननिश्चितीची विनंती अशा याचिकांमध्ये न चुकता करावी, **असाहि निर्णय घेण्यात आला.**

# कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना दि.१.१.१९९६ पासून नवीन वेतनश्रेणी लागू करणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : शनिवार, दिनांक २७ डिसेंबर २००८ : तिसरे अधिवेशन २००८*

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना दि.१.१.१९९६ पासून नवीन वेतनश्रेणी लागू करणे यासंबंधी **श्री.वसंतराव खोटरे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.दिलीपराव सोनवणे,वि. प. स.** यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

**श्री.वसंतराव खोटरे** ( अमरावती विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम १०१ अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाच्या सर्व प्रवर्गांना नवीन वेतनश्रेणी १ जानेवारी १९९६ पासून लागू होणे, मात्र कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना सदर वेतनश्रेणी दिनांक १ मार्च २००० पासून लागू होणे, वेतनश्रेणीमधील तफावत संपुष्टात आणण्यासाठी शिक्षण मंत्री आणि वित्त मंत्री यांनी दिनांक २ एप्रिल २००८ रोजी विधान भवन येथे झालेल्या बैठकीमध्ये सहमती दर्शविणे, एक महिन्याच्या आत निर्णय घेण्याचा त्याच बैठकीत निश्चय होणे, विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स आसोसिएशनचे अध्यक्ष व सचिवांनी शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १५ सप्टेंबर, २००८ रोजी वा त्यादरम्यान शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्यामार्फत एक निवेदन देणे, याबाबतीत अद्याप कोणताही निर्णय न होणे, परिणामी संबंधित शिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याप्रकरणी राज्यभरातील शिक्षकांतर्फे आयोजित करण्यात आलेला मोर्चा, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**श्री.नाना पंचबुध्दे** ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

## अमरावती विभागातील अनेक प्राध्यापकांच्या थकबाकीची रक्कम अडवून ठेवल्याबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २००८*

*मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८*

**(५२) * ४६२५७ दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे, प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय, विद्याभारती महाविद्यालय, मातोश्री विमलाबाई महाविद्यालय या महाविद्यालयातील अनेक प्राध्यापकांना निवडश्रेणीतील स्थाननिश्चिती, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती, वेतनवाढी इत्यादी पोटी शासनाने मंजूर केलेल्या रक्कमांची थकबाकी गेल्या अनेक महिन्यापासून अकारण अडवून ठेवल्याच्या तक्रारी या महाविद्यालयातील या शिक्षकांनी ऑगस्टच्या शेवटच्या आठवडयात व सप्टेंबरच्या सुरुवातीला सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग, अमरावती यांच्याकडे दाखल केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) या तिन्ही महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी या तक्रारी खऱ्या असल्याच्या निवेदनासह सहसंचालकाकडे सूपूर्त केल्या, हे ही खरे आहे काय,

(३) महाराष्ट्राच्या इतर कोणत्याही भागात असा प्रकार घडलेला नसून फक्त अमरावती विभागातच हा प्रकार सतत घडत आहे अशी तक्रार करणारे एक निवेदन नागपूर युनिव्हर्सिटी टिचर्स असोसिएशच्या सहसचिवांनी दिनांक ८ सप्टेंबर, २००८ रोजी किंवा त्या दरम्यान संचालक उच्च शिक्षण यांच्याकडे या सर्व कागदपत्रासह सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांच्यामार्फत पाठविले हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(५) नसल्यास, याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१), (२),(३) होय,

(४) सदर रक्कम त्वरीत अदा करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना सूचना दिल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**मा. शालेय शिक्षण मंत्री यांचे निवेदन**

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना शासन अधिसूचना दिनांक १० डिसेंबर, १९९८ अन्वये पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी लागू करण्यात आल्या आहेत. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाने दिनांक १३ मे, १९९९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील खाजगी शाळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी संदर्भात आदेश काढलेले आहेत. त्यानुसार राज्यातील अशासकीय उच्च माध्यमिक शाळातील/कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून प्रथमश्रेणी रुपये ६५००-१०५०० व वरिष्ठ श्रेणी रुपये ७५००-१२००० अशी वेतनश्रेणी मंजूर केलेली आहे. ही वेतनश्रेणी केंद्र शासनाने पदव्युत्तर पदवी शिक्षकांची प्रथमश्रेणी रुपये ६५००-१०५००, वरिष्ठ श्रेणी रुपये ७५००-१२००० व निवडश्रेणी ८०००-१३००० ही त्रिस्तरीय वेतनश्रेणी लक्षांत घेऊन व राज्यातील उच्च माध्यमिक शाळातील/ कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व शासन यांच्यात सप्टेंबर, १९९९ मध्ये झालेल्या समझोत्यानुसार मंजूर केलेली आहे.

दिनांक १९ फेब्रुवारी, २००० रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत वेतनश्रेणी सुधारण्याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे वेतनश्रेणी सुधारण्यास मान्यता दिली आहे. त्याअनुषंगाने दिनांक ३ जून, २००० च्या शासन निर्णयान्वये सुधारित वेतनश्रेण्या दिनांक १ मार्च २००० पासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

| अ. क्र. | पदनाम | मंजूर वेतनश्रेणी (५ व्या वेतन आयोगाप्रमाणे) | सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालय पूर्णवेळ शिक्षक | रुपये ६५००-१०५०० प्रथमश्रेणी रुपये ७५००-१२००० वरिष्ठश्रेणी | रुपये ७२२५-२२५-११०५० प्रथमश्रेणी रुपये ८०००-२७५-१३५०० द्वितीयश्रेणी रुपये ९१२५-२७५-१४०७५ निवडश्रेणी |
| २ | अपूर्ण अर्हताधारक शिक्षक | रुपये ५०००-८००० अधिक विशेष वेतन रु. २५० रुपये ५५००-९००० वरिष्ठश्रेणी रुपये ६५००-१०५०० निवडश्रेणी | रुपये ५५००-१७५-९००० अधिक विशेष वेतन रु. २५० रुपये ६५००-२००-१०५०० वरिष्ठश्रेणी रुपये ७५००-२५०-१२००० निवडश्रेणी |
| ३ | उच्च माध्यमिक वर्ग जोडलेल्या माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक | रुपये ७४५०-११५०० अधिक विशेष वेतन रु. २०० रुपये ७५००-१२००० अधिक विशेष वेतन रु. २०० वरिष्ठश्रेणी | १) रुपये ७५००-१२००० विशेष वेतन रु. २०० २) रुपये ९१२५-१४०७५ विशेष वेतन रु. २०० |
| ४ | माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक व अध्यापक विद्यालयांचे प्राचार्य | रुपये ७५००-१२००० रुपये ८०००-२७५-१३५०० वरिष्ठश्रेणी | १) रुपये ७५००-१२००० २) रुपये ९१२५-१४०७५ |
| ५ | उपमुख्याध्यापक | रुपये ६५००-१०५०० | रुपये ७२२५-२२५-११०५० रुपये ८०००-१३५०० |

त्यानंतरही संबंधित शिक्षकांच्या संघटनेने वारंवार दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनावर निरनिराळ्या प्रकारे

संपर्क साधलेला आहे.

याबाबत सदरची वेतनश्रेणी ही राज्य शासनाने केंद्र सरकारच्या वेतनश्रेणीहून जास्त स्वरुपात दिलेली असल्याने, ती ज्या तारखेपासून हा निर्णय घेण्यात आलेला आहे, त्या अनुषंगाने देण्यात आलेली आहे. त्यामुळे त्याच तारखेपासून ती लागू होईल. सद्यस्थितीत वित्त विभागाने त्यांचे परिपत्रक क्रमांक वेपूर १२०७/प्र.क्र.२/२००७/सेवा-९, दिनांक ५ मार्च, २००७ अन्वये कोणताही प्रस्ताव वेतन सुधारणा करण्याकरिता सादर करु नये असे आदेशित केले आहे. तथापि, अशी पदे सामाजिक न्याय, आदिवासी विकास, ग्राम विकास विभाग व शालेय शिक्षण विभागाशी संबंधित असल्याने, तसेच कोणत्याच विभागाची माहिती प्राप्त झालेली नाही. फक्त शालेय शिक्षण विभागाचा प्रस्ताव वित्त विभागास सादर केला असता, दिनांक १९.९.२००८ रोजी वित्त विभागाने सहावा वेतन आयोग अंमलात आणतांना याचा विचार करण्यात येईल. आता यावर कोणत्याही कार्यवाहीची आवश्यकता नाही असे अभिप्राय दिले आहेत.

सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत श्री. हकीम यांचे अध्यक्षतेखाली जी समिती नेमली आहे त्यांच्यासमोर निरनिराळ्या संघटना त्यांच्या मागण्या सादर करु शकतात.

**श्री.वसंतराव खोटरे :** सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रवर्गांना दिनांक १.१.१९९६ पासून पाचवा आयोग लागू झाला आहे. तसेच अनेक प्रवर्गांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करुन दि.१.१.९६ पासूनच पाचवा आयोग लागू केला आहे. पण कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना मात्र दि.१.३.२००० पासून पाचवा वेतन आयोग लागू केला आहे. त्याऐवजी दि.१.१.९६ पासून पाचवा वेतन आयोग लागू करण्यासाठी विदर्भ ज्युनिअर कॉलेज शिक्षक महासंघाने शासनाला निवेदन दिलेले आहे, पण शासनाने त्याची दखल घेतलेली नाही. त्यानंतर दिनांक २.४.२००८ रोजी माननीय सभापतींच्या दालनामध्ये माननीय वित्त मंत्री, माननीय शिक्षण मंत्री यांच्यासोबत या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक झाली होती. त्या बैठकीत काय निर्णय झाला याची माहिती माननीय मंत्री महोदय देतील काय ?

**श्री.नाना पंचबुध्दे :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे माननीय सभापतींच्या दालनामध्ये दि.२.४.२००८ रोजी बैठक झाली होती. त्या बैठकीला माननीय वित्त मंत्री, माननीय शिक्षण मंत्री, माननीय संसदीय कार्य मंत्री, लोकप्रतिनिधी आणि या शिक्षकांचे प्रतिनिधी यांच्याबरोबर चर्चा झाली. त्या चर्चेच्या अनुषंगाने माननीय वित्त मंत्र्यांनी शालेय शिक्षण विभागाबरोबरच आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय विभाग आणि ग्रामविकास विभाग या विभागांची माहिती संकलित करुन प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुषंगाने शिक्षण विभागाने पत्र वितरित केले होते. परंतु अजूनपर्यन्त अन्य विभागाकडून माहिती अप्राप्त आहे. शिक्षण विभागाकडून माहिती घेऊन ती वित्त विभागाकडे पाठविण्यात आली. वित्त विभागाने ६वा वेतन आयोग लागू केला जाईल त्यावेळी यांचा निश्चितपणे विचार केला जाईल.....

**प्रा. बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, हा प्रश्न माननीय पीठासीन अधिकाऱ्यांशी संबंधित आहे. मी देखील काही मुद्यांची नोटीस दिलेली आहे. लक्षवेधीच्या संदर्भात शालेय शिक्षण खात्यामध्ये एक नवीन पध्दत सुरु झालेली आहे. ती अशी की, **लक्षवेधीतील मुद्यांना उत्तर दिले जात नाही, त्याऐवजी बाकीचा सारा निबंध दिला जातो. या लक्षवेधीमध्ये दिलेल्या मुद्यांच्या संदर्भात दोन पानी उत्तर दिलेले आहे. पण एकाही मुद्यांला उत्तर दिलेले नाही.** या प्रश्नाच्या संदर्भात माननीय पीठासीन अधिकारी यांनी २ एप्रिल २००८ रोजी बैठक बोलाविलेली होती. सभापती महोदय, तुम्ही आणि आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. पीठासीन अधिकारी शे पाचशे नाहीत ना? फक्त चारच आहेत. माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी बोलाविलेल्या बैठकीमध्ये काही डेफिनेट अशा प्रकारचे निर्णय झाले होते. सूचना देवून सुद्धा त्या निर्णयाच्या संदर्भात निवेदनामध्ये उत्तर दिलेले नाही. त्या दिवशीच्या बैठकीमध्ये माननीय अर्थमंत्र्यांनी असे सांगितले की, "५व्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी विचारात घेण्यात येऊ नये असा निर्णय वित्त विभागाने पूर्वीच घेतलेला आहे तरी सुध्दा ही मागणी विचारात घेता शिक्षण विभागाने या संदर्भात योग्य त्या खर्चासहीत प्रस्ताव तयार करावा. शिक्षण विभागाच्या एका अधिकाऱ्याने इतर विभागांचा विषय काढला मिनिटस्‌मध्ये असे म्हटलेले आहे की, स्वतः वित्त मंत्री असे म्हणाले की, "सर्व विभाग मिळून किती बोजा शासनावर पडेल याची एकत्रित माहिती घेऊन तो प्रस्ताव शिक्षण मंत्र्यांनी कॅबिनेट समोर आणावा." माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी त्याच बैठकीमध्ये असे सांगितले की, यासाठी "टाईम बाऊण्ड प्रोग्राम आखावा आणि एक महिन्याच्या आत निर्णय घेण्यात यावा. शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा." माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी त्या बैठकीत एवढेच सांगितले की, "अर्थमंत्र्यांनी आणि शिक्षण मंत्र्यांनी आपल्या मागण्यांच्या संदर्भात सकारात्मक विचार केलेला आहे." १ महिन्याच्या आत निर्णय घेण्याचे तेथे ठरले. सभापती महोदय, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांसमवेत ही जी चर्चा झाली त्यासंबंधी एका शब्दाचेही उत्तर लक्षवेधीच्या निवेदनात सूचना देऊनही दिलेले नाही. मात्र बाकीचा कथाभाग पूर्ण दोन पानात दिलेला आहे. त्यामुळे प्रश्नाला न्याय मिळण्याच्या संदर्भातील गोष्टी आम्हाला पुन्हा पुन्हा येथे सांगाव्या लागतात आणि त्यामुळे आम्हीच किती तरी वेळ बोलतो अशी भावना निर्माण होते. हा प्रश्न पीठासीन अधिका-यांशी संबंधित आहे. तीन कॅबिनेट मंत्री त्या बैठकीला उपस्थित होते. आपण लोकप्रतिनिधी आहोत. आपण माननीय पीठासीन अधिकाऱ्यांसमोर प्रश्न आणला तर ते काय चूक आहे काय ? पीठासीन अधिकाऱ्यांनी बोलाविलेल्या बैठकीला तीन कॅबिनेट मंत्री हजर होते. त्या बैठकीत निर्णय झालेला असतांना या लक्षवेधीच्या निवेदनावर जो निबंध लिहिलेला आहे, त्यामध्ये त्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने या निबंधामध्ये एका शब्दाने उल्लेख आलेला नाही. या लक्षवेधीच्या निवेदनामध्ये शेवटी उद्धट उत्तर दिलेले आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत श्री. हकीम यांचे अध्यक्षतेखाली जी समिती नेमली आहे त्यांच्या समोर निरनिराळ्या संघटना त्यांच्या मागण्या सादर करु शकतात." हा कमालीचा उद्धटपणा आहे. म्हणजे हा प्रश्न माननीय पीठासीन अधिकारी, शिक्षण मंत्री आणि वित्त मंत्री यांच्या समोर सादर केला तर हा काय गुन्हा झाला काय ? त्यासंबंधी एक शब्द या निवेदनामध्ये नाही. हा प्रश्न राखून ठेवावा असे मी म्हणणार नाही. मी फक्त पॉईण्टेड प्रश्न विचारतो. पीठासीन अधिकाऱ्यांसमोर निर्णय झाला. कॅबिनेट मंत्र्यांनी तेथे सांगितले त्याप्रमाणे १ महिन्यामध्ये कार्यवाही करावयाची, असा निर्णय झाला होता. त्यानुषंगाने कार्यवाही केली नाही. सभापती महोदय, एप्रिल महिन्यामध्ये मिटींग झाली. आता अजून डिसेंबर पर्यंत याचा एक महिना संपलाच नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. भाष्कर जाधव)

ही गोष्ट योग्य झालेली नाही. संसदीय प्रथा,परंपरा यांचे विभागाने पालन केले पाहिजे त्याबाबत त्यांनी अतिशय लांच्छनास्पद वर्तन केलेले आहे. माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी कबूल करावे की, एका महिन्यात आमच्याकडून कार्यवाही झाली नाही, ती कार्यवाही आम्ही आता तरी निदान पुढच्या एका महिन्यात करु. जर यासंबंधीची कार्यवाही होणार नसेल तर ती गोष्ट फार गंभीर आहे. सभापती महोदय, यासंबंधी आपण शासनाला वेगळे आदेश द्यावेत असे मी म्हणणार नाही. पीठासीन अधिकाऱ्यांनी बोलाविलेल्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी विभागाच्या अधिकाऱ्यांनी करावयास पाहिजे असे पीठासीन अधिकाऱ्यांनांच पुन्हा सांगावे लागेल. माननीय राज्यमंत्री महोदय, माननीय पीठासीन अधिकाऱ्यांना पुन्हा आदेश देण्याची वेळ येऊ देऊ नका. ही गोष्ट शिक्षण विभागाला अतिशय लाजिरवाणी आहे. यासंबंधी मी परवाच उल्लेख केलेला आहे. शिक्षण विभागावर अशी वेळ या अधिवेशनात तिस-यांदा आलेली आहे. सभागृहात उपस्थित केलेल्या मुद्यांना उत्तर न देणे, नाही ती पुराणातील माहिती निवेदनात नमूद करणे आणि सन्माननीय सदस्यांचा वेळ घेणे ही गोष्ट बरोबर नाही. शालेय शिक्षण विभागाने यासंबंधीची कार्यवाही एका महिन्यात केली नाही ती चूक केली आहे. मी या ठिकाणी बैठकीतील निर्णय मघाशी वाचून दाखविले. ते निर्णय झाले होते की नाही असा प्रश्न विचारला असता पण तसे निर्णय झाले होते ही गोष्ट माननीय मंत्री महोदयांनी कबूल केली आहे. तशा प्रकारचे निर्णय पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीत झाले होते किंवा नाही ? निर्णय झाले असतील तर त्या अनुषंगाने पुढच्या एका महिन्याच्या आत कार्यवाही केली जाईल काय ?

**श्री.नाना पंचबुध्दे** :सभापती महोदय, मी पूर्वी सांगितले की, सहावा वेतन आयोग लागू करण्यात येईल, त्यावेळी या गोष्टींचा निश्चितपणे विचार केला जाईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** मघाशी मी जे निर्णय वाचून दाखविले ते निर्णय पीठासीन अधिकाऱ्यांच्या बैठकीत झाले होते काय ? झाले असतील तर होय म्हणा अथवा नाही म्हणा. सन्माननीय शालेय शिक्षण राज्यमंत्र्यांनी पुन्हा माझे म्हणणे पूर्णपणे ऐकून घ्यावे. सहाव्या वेतन आयोगासंबंधीची माहिती कशाला सांगितली जात आहे. सहाव्या वेतन आयोगासंबंधी शासनाने जी.आर.काढलेला आहे. सहावा वेतन आयोग लावल्यामुळे पाचव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने जे प्रश्न उपस्थित झाले आहेत, त्यासंबंधी काही करता येणार नाही असे आपल्याकडून सांगितले जाईल. यासंबंधात शासनाने दोन,चार जी.आर.काढलेले आहेत. काल, परवा देखील यासंबंधी जी.आर.काढला आहे. या ठिकाणी माननीय राज्य मंत्री महोदयांनी माझा प्रश्न समजून घ्यावा. माझा प्रश्न समजून घेतला नाही तर आपण पुन्हा निबंध वाचून दाखवाल. मी त्यावर पुन्हा चार निर्णय वाचून दाखवितो. इतिवृत्ताप्रमाणे स्वतः माननीय अर्थमंत्र्यांनी त्या बैठकीत असे सांगितले की, "पाचव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील त्रुटी बाबतचे प्रस्ताव विचारात घेण्यात येऊ नये असा निर्णय वित्त विभागाने पूर्वीच घेतला आहे. तरी सुध्दा सदर मागणी विचारात घेता शिक्षण मंत्र्यांनी यासंदर्भात प्रस्ताव तयार करुन योग्य त्या शिफारशीसह मंत्रिमंडळासमोर आणावा." तुमच्या समोर इतिवृत्त उपलब्ध आहे ते तुम्ही पहा. त्या इतिवृत्तात खाली असे वाक्य आहे की, "सर्व विभागांमिळून

किती बोजा शासनावर पडेल याची एकत्रित माहिती घेऊन तो प्रस्ताव शिक्षण मंत्र्यांनी कॅबीनेट समोर आणावा." संसदीय कार्यमंत्र्यांनी असे सांगितले की, "यासंदर्भात टाईम बाऊंड प्रोग्रॅम आखावा व एक महिन्यात निर्णय घेण्यात यावा. येते शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा." अशा प्रकारचे निर्णय त्या बैठकीत घेण्यात आले होते किंवा नाही ? त्या निर्णयांची अंमलबजावणी आतापर्यंत केली नाही, ती निदान आता पुढच्या एका महिन्यात करण्यात येईल काय ?

**श्री.नाना पंचबुध्दे** : सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की....

**तालिका सभापती (श्री.भास्कर जाधव )** : सन्माननीय सदस्यांनी अतिशय पॉईन्टेड प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांचे म्हणणे असे आहे की, एप्रिल महिन्यामध्ये सभापतींच्या उपस्थितीमध्ये माननीय मंत्री महोदयांच्या समवेत या विषयाच्या बाबतीत एक बैठक झाली. त्या बैठकीत जे निर्णय घेतले गेले. त्या निर्णयांची अंमलबजावणी केली जाणार आहे किंवा नाही यासंबंधीची त्यांना माहिती हवी आहे. यासंदर्भात कसे उत्तर द्यावयाचे ते तुम्ही ठरवा.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सदर चार निर्णय त्या बैठकीत झाले होते किंवा नाही ? त्या निर्णयांची शासनाने आतापर्यंत कार्यवाही केली नाही. ती कार्यवाही पुढील एका महिन्यात करण्यात येईल काय ? मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आणावा अशा प्रकारचा निर्णय त्या बैठकीत घेतला गेला आहे, तसा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणला जाईल की नाही ? या प्रश्नांची मला उत्तरे हवी आहेत.

**श्री. नाना पंचबुध्दे** : पीठासीन अधिका-यांसमवेत झालेल्या बैठकीत जे निर्णय झाले होते त्यासंबंधाने एका महिन्यात कार्यवाही केली जाईल.

**प्रा.बी.टी.देशमुख** : एक महिन्यात कार्यवाही करण्याचे माननीय राज्यमंत्री यांनी आश्वासन दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. सदर चार निर्णयाचा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात करायला पाहिजे होता तो तुम्ही केला नाही. हे चार निर्णय त्या बैठकीत झाले होते हे खरे आहे ना? यासंबंधीचे मला उत्तर मिळाले पाहिजे.

**श्री. नाना पंचबुध्दे** : होय. इतर संबंधित विभागांची माहिती घेऊन एका महिन्यात निर्णय घेतला जाईल.

**श्री.रामनाथ मोते** : सभापती महोदय, या विषयावर १ एप्रिल, ०८ रोजी सभागृहात चर्चा झाली होती. २ एप्रिल, ०८ रोजी सन्माननीय पीठासीन अधिकारी यांच्याकडे बैठक झाली होती. त्या बैठकीमध्ये एक महिन्यात करतो असेही म्हटले. १.४.२००८ ला चर्चा झाली त्यावेळीही सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहात उत्तर दिले होते की, १ महिन्याच्या आत तातडीने मंत्रिमंडळासमोर जाऊन निर्णय घेऊ. १.४.०८ ला आश्वासन दिले त्याची पूर्तता झाली नाही. आता सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्रश्न उपस्थित केला त्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्रीमहोदय म्हणाले की, एका महिन्यात निर्णय घेणार आहोत. इतर संवर्गासाठी शासनाने २००६ मध्ये जी.आर. काढला, त्यांना १९९६ पासून पाचवा वेतन आयोग लागू केला. ३ जून, २००० ला जी.आर.काढून कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना मार्च, २००० पासून पाचवा वेतन आयोग लागू केला. त्यामुळे ही तफावत दूर करण्यासाठी १ एप्रिलला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाली नाही. आता सभागृहात दिलेल्या आश्वासनानुसार पुन्हा हा विषय सभागृहात मांडावा लागणार नाही यादृष्टीने दिलेले आश्वासन पाळले जाईल काय? एका महिन्यात आश्वासनाप्रमाणे निर्णय घेतला जाईल काय?

**श्री.नाना पंचबुध्दे** : होय.

**श्री.कपिल पाटील** : सभापती महोदय, हा प्रश्न सरळ सरळ चोरीचा आहे. सहावा वेतन आयोग येत असून पाचव्या वेतन आयोगानुसार फरकाची रक्कम दिली जात नाही. हा सरळ सरळ चोरीचा प्रकार आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, एका महिन्यात सादर करु. शिक्षण विभागाचा प्रस्ताव वित्त विभागाला १९.९.०८ रोजी सादर झाला. सहाव्या वेतन आयोगात विचार करीत आहोत असे निवेदनात म्हटले आहे. आता एका महिन्यात निर्णय घेऊ असे मंत्रीमहोदय सांगतात. परंतु वित्त विभागाने प्रस्ताव नाकारला आहे. हकीम समितीपुढे म्हणणे मांडा असे निवेदनात म्हटले आहे. मागील फरकाची रक्कम ताबडतोब देणार आहात का? वित्त विभागाने प्रस्ताव नाकारला आहे.

**श्री.नाना पंचबुध्दे** : मी यापूर्वीच सांगितले आहे की, सर्व विभागांची माहिती घेऊन एका महिन्याच्या आत कारवाई करु.

**श्री.दिवाकर रावते** : सभापती महोदय, हा विषय मी वाचल्यानंतर माझ्या लक्षात आले की, १९९६ पासून जर मागणी मान्य केली असेल तर काही विभागामध्ये २००० पासून पाचवा वेतन आयोग का लागू केला? एकदा तत्व स्वीकारल्यानंतर त्याप्रमाणे सर्वांना निर्णय लागू झाला पाहिजे. शिक्षकांचे प्रश्न जाणीवपूर्वक उपस्थित करावयास लावता का? स्वीकारलेल्या तत्वाप्रमाणे वेतनश्रेणी लागू केली जाईल का? प्रत्येक वेळी वित्त विभागाकडून आडकाठी का आणली जाते?

**श्री.कपिल पाटील** : शिक्षण विभागातीलच एका कक्षाला फायदा दिला जातो व दुसऱ्या कक्षाला फायदा दिला जात नाही हा भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी १९९६ पासून पाचवा वेतन आयोग लागू करणार आहात की नाही?

**श्री.नाना पंचबुध्दे** : मी यापूर्वीच सांगितले की, इतर विभागात शिक्षक आहेत त्या सर्वांची माहिती घेऊन एका महिन्याच्या आत निर्णय करु.

**श्री.सतीश चव्हाण** : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख प्रत्येक अधिवेशनात हा विषय उपस्थित करतात, त्यावेळी निर्णयासाठी एका महिन्याची मुदत शासनाकडून मागितली जाते. पुढील अधिवेशनात सुध्दा सन्माननीय सदस्यांना पुन्हा हा विषय उपस्थित करावा लागेल. त्यावेळी देखील एका महिन्याची मुदत मागितली जाईल. पीठासीन अधिकाऱ्यांकडे झालेल्या बैठकीत जे चार निर्णय घेण्यात आले त्यानुसार वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला हे खरे आहे काय? वित्त विभागाने तो प्रस्ताव नाकारला हेही खरे आहे काय?

**श्री.नाना पंचबुध्दे** : फक्त शिक्षण विभागाचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला होता. इतर विभागांची माहिती अप्राप्त होती.

**श्री.सतीश चव्हाण** : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही?

**तालिका सभापती (श्री. भास्कर जाधव)** : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, रिजेक्ट केलेले नसून फक्त एकाच विभागाचा प्रस्ताव प्राप्त झाला, इतर विभागांचे प्रस्ताव अप्राप्त होते.

**श्री. सुभाष साळुंके** : महोदय, १ जानेवारी, १९९६ पासून पाचवा वेतन आयोग लागू करणार अशी घोषणा सन १९९८ मध्ये शासनाने केली होती व तो वेतन आयोग सन १९९९ मध्ये प्रत्यक्षात लागू झाला होता. त्यावेळेस शासनाने सवंग लोकप्रियता मिळविली आणि सांगितले की, राज्यातील सर्व शिक्षकांनाही पाचवा वेतन आयोग लागू करणार. परंतु सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिले की, अजूनही राज्यातील डी.एड., बी.एड. शिक्षकांना ती वेतनश्रेणी शासनाने दिलेली नाही. आय.टी.आय. इन्स्ट्रक्टर्सच्या बाबतीत सांगायचे तर सन २००४ पर्यंत ही वेतनश्रेणी त्यांना दिली नव्हती. अशा प्रकारे पाचवा वेतन आयोग सर्व शिक्षकांना लागू झालेला नसून अजूनही ५० टक्के शिक्षकांना नियमानुसार वेतनश्रेणी मिळत नाही, म्हणून त्यांची ओरड आहे. परवा २३ डिसेंबर, २००८ रोजी शासनाने नेमलेल्या हकीम समितीची मुदत संपली. त्या समितीचा अहवाल आल्यानंतर ज्या वेतनश्रेण्या निर्धारित केल्या जातील त्यातही या शिक्षकांना न्याय मिळणार नाही. म्हणून एक महिन्यात या शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी काढून त्यांचे नुकसान होणार नाही याचाही विचार करणे आवश्यक आहे. म्हणून या शिक्षकांच्या ज्या समस्या आहेत त्या जाणून घेऊन त्यात दुरुस्ती करावी आणि सन १९९६ पासून असलेल्या त्रुटीची दुरुस्ती होईल, हे पहावे. म्हणून शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत हकीम समितीचा अहवाल येण्यापूर्वी शासन दूर करणार काय ?

**श्री. नाना पंचबुध्दे** : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, सहावा वेतन आयोग......

**प्रा.बी.टी.देशमुख** : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले ते योग्य नाही. कारण हा या शिक्षकांवर अन्याय होत आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी ठामपणे सांगितले, त्यासंबंधीचे कार्यवृत्त देखील माझ्याकडे आहे. ते म्हणाले होते की, "सर्व विभागांचे प्रस्ताव एकत्रितपणे ठेवावेत." यांनी फक्त शिक्षण विभागाचा प्रस्ताव ठेवला तेव्हा आता वित्त विभागाने हा प्रस्ताव फेटाळला असे उत्तर देणे योग्य नाही. याचा अर्थ असा होतो की, वित्त विभागासमोर ठरल्याप्रमाणे प्रस्ताव नेलाच नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी प्रश्न विचारला की, शालेय शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे पाठविलेला प्रस्ताव वित्त विभागाने फेटाळला, हे खरे काय ? त्याला माननीय मंत्री महोदयांनी 'नाही' असे उत्तर दिलेले आहे. ते पुढे असेही म्हणाले की, सर्व विभागांचे प्रस्ताव प्राप्त झालेले नव्हते.

**प्रा.बी.टी.देशमुख** : महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी सर्व विभागांचे प्रस्ताव एकत्र आणण्याचे सांगितले होते. परंतु माननीय मंत्री महोदयांनी आता सांगितले की, सर्व माहिती त्यांच्याकडे आलेली नाही. म्हणजे त्यांना एकत्रित प्रस्ताव ठेवता आला नाही. म्हणून माझी अशी सूचना आहे की, एक महिन्यात ही सर्व माहिती घेऊन ठरल्याप्रमाणे शालेय शिक्षण विभागामार्फत प्रोसेस पूर्ण करण्याचे आदेश देणार काय ?

**श्री. पंचबुध्दे** : महोदय, ही सर्व माहिती घेऊन एक महिन्यात आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

*****

(२)

# संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक

*महाराष्ट्र विधानपरिषद : मंगळवार, दिनांक २३ डिसेंबर २००८ : तिसरे अधिवेशन २००८*

(५) * ४६२०० **प्रा. बी. टी. देशमुख, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. विक्रम काळे** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देताना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणूकीबाबत मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ ची याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे शासनाने काय कारवाई केली आहे,

(२) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.राजेश टोपे** : (१) व (२) याचिका क्रमांक ९९८/२००७ वर मा.उच्च न्यायालयाने दि. २६.११.२००७ रोजी दिलेल्या आदेशानुसार उचित असा निर्णय घेण्याची बाब विभागाच्या विचाराधीन असून त्याप्रमाणे मंत्रिमंडळासमोर लवकरच प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यात जो निर्णय होईल तो संगणक शास्त्र विषयाच्या बाबतीत लागू होईल.

परंतू प्रशासकीय कारणास्तव असा निर्णय घेण्याकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**प्रा. बी.टी.देशमुख** : संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देताना जो भेदभाव करण्यात येतो त्या अनुषंगाने मला असे विचारावयाचे आहे की, "संगणक शास्त्र हा विषय विज्ञान शाखेअंतर्गत शिकविला जातो म्हणून विज्ञान शाखा १०० टक्के अनुदानावर असल्याने संगणक शास्त्र या एका विषयाला ओघाने अनुदान देणे क्रमप्राप्त ठरते. असे असतांना काही महाविद्यालयांमध्ये संगणक शास्त्र विज्ञान शाखाअंतर्गत असतांनाही अनुदान दिले तर काहींना दिले नाही," ही गोष्ट खरी आहे काय? त्याचप्रमाणे "महाविद्यालयात विज्ञान शाखा १०० टक्के अनुदानावर असूनही संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला कायम विना अनुदानित तत्वावर परवानगी देण्यात आली आहे त्यामुळे अशा कॉलेजेसमधील विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव निर्माण होतो असे निदर्शनास आले. त्यामुळे अनेक महाविद्याल्यात संगणक शास्त्र या विषयाची कायम विना अनुदानित ही अट काढून टाकली तर काही कॉलेजेसची कायम विनाअनुदानित ही अट काढली नाही," हे खरे आहे काय?

**श्री. राजेश टोपे** : महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी दोन प्रश्न विचारले ते दोन्ही प्रश्न खरे आहेत. एक मात्र नक्की आहे की, जे धोरण राज्यशासनाने निश्चित केले होते त्यानुसार सन १९९१ नंतर वैकल्पिक विषयाला कायम विना अनुदानित ग्राह्य धरणार होतो. त्यानंतर सुध्दा अशा काही मान्यताप्राप्त विज्ञान शाखा आणि त्यांना अटॅच असलेले वैकल्पिक विषय असतील त्यांना अनुदान देण्याच्या दृष्टीने काही प्रमाणात निश्चित प्रकारे शासन आणि संचालक पातळीवर डिस्क्रीमिनेशन झाले आहे, जी विसंगती घडलेली आहे ते मी सांगू इच्छितो.

**श्री. विक्रम काळे** : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सन १९९१ नंतर धोरण नसताना सुध्दा काही महाविद्यालयांमध्ये अनुदानित आणि काही महाविद्यालयांना विना अनुदानित विषय दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाने डिसेंबर, २००१ पासून या राज्यात कायम विना अनुदानित धोरणाची अंमलबजावणी सुरु केली. प्रश्न असा आहे की, कायम विना अनुदानित तत्व डिसेंबर, २००१ ला शासनाने स्वीकारले असले तरी त्यापूर्वी सुध्दा काही महाविद्यालयांना संगणक शास्त्र विना अनुदान तत्वावर दिलेले आहेत तर काहींना अनुदानित तत्वावर या विषयांना मान्यता दिलेली आहे. अशा प्रकारे भेदभाव झालेल्या सर्व महाविद्यालयांना या विषयासाठी शासन अनुदान देणार काय? त्याचबरोबर संगणक शास्त्र विषयात जसा भेदभाव झाला तसाच भेदभाव शारीरिक शास्त्र या विषयाच्या बाबतीत सुध्दा झालेला आहे. म्हणून डिसेंबर, २००१ पूर्वी ज्या महाविद्यालयांना शारीरिक शास्त्र हा वैकल्पिक विषय असणाऱ्या आणि संगणक शास्त्र वैकल्पिक विषय असणाऱ्या महाविद्यालयांना शासन अनुदानावर आणण्यासंबंधीचा निर्णय घेणार काय ?

**श्री. राजेश टोपे** : सभापती महोदय, मी अगोदरच, सन १९९१ नंतर वैकल्पिक विषयाला कायम विना अनुदानित म्हणूनच मान्यता राहील, असे स्पष्ट धोरण असताना काही प्रमाणात राज्यात ज्या घटना घडल्या ते मान्य केले. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, सन २००१ ला कायम विनाअनुदानित तत्वावर महाविद्यालयांना मान्यता देण्यासंबंधीचे धोरण शासनाने स्वीकारले. त्यामुळे सन १९९१ ते २००१ या काळात कायम विनाअनुदानित कॉलेजेसना मान्यता देणार काय? यासंदर्भात मला असे स्पष्ट करावयाचे आहे की, यापूर्वी ज्या चुका घडल्या त्यांच्याबाबत चौकशी होणे आवश्यकच आहे आणि ती करण्यात येईल. परंतु कोर्टाने मधल्या काळात ऑर्डर्स दिल्या होत्या की याबाबत शासनाने उचित निर्णय घ्यावा. त्या अनुषंगाने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, अनेक वैकल्पिक विषय मग त्यात कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स सायन्स, शारीरिक शास्त्र या विषयांची व्याप्ती तसेच त्यासाठी नेमलेले प्राध्यापक आणि अधिव्याख्याते तसेच विद्यार्थ्यांची संख्या ही सर्व व्याप्ती लक्षात घेऊन निश्चितपणे मंत्रिमंडळासमोर हा विषय जाणार आणि लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल.

**श्री. वसंतराव खोटरे** : महोदय, ही अत्यंत गंभीर बाब आहे की काही महाविद्यालयांची कायम विनाअनुदानित ही अट काढून टाकली तर काहींची काढली नाही, अशा प्रकारे भेदभाव जो केलेला आहे तो नष्ट करुन ज्या अधिकाऱ्यांनी असा निर्णय घेतला त्यांच्यावर कारवाई करणार काय? तसेच उर्वरित महाविद्यालयांना भूतलक्षी प्रभावाने कायम विनाअनुदानित मधून अनुदानित तत्वावर मान्यता देऊन फायदा देणार काय ?

**श्री. राजेश टोपे** : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात विसंगती झालेली आहे हे मी सांगितलेले आहे त्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या संदर्भात जो निर्णय असेल तो घेण्यात येईल. परंतु सर्वांना सरसकट अनुदान देण्याच्या दृष्टीने बॅक इफेक्टच्या संदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, या विषयाच्या संदर्भात हायकोर्टाने जे ऑर्डर्स दिलेले आहेत त्याचे पालन करण्यामध्ये शासनाकडून विलंब झालेला आहे हे मी मान्य करतो. हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी निश्चितपणे आणला जाईल आणि येणा-या अधिवेशनाच्या अगोदर या संदर्भात निर्णय घेतला जाईल. या विषयाच्या संदर्भात मंत्रिमंडळात योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**प्रा. बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, हा विषय मूळ प्रश्नापासून दूर जाता कामा नये अशी विनंती आहे. या सभागृहात संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना भेदभावपूर्ण वागणूक दिली आहे, हे मान्य करावयाचे परंतु हा भेदभाव दूर करण्यासाठी काहीही प्रयत्न करावयाचे नाहीत, असे या शासनाचे धोरण आता झाले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात कोर्टाने २६ नोव्हेंबर, २००७ रोजी जे निर्देश दिलेले आहेत ते मी या ठिकाणी वाचून दाखवतो.

"However, if the State Government has granted permission to some colleges and institutions to start the above subject on No Grant Basis, in that case, we permit the Petitioner to make representation in this regard to the State Government within a period of four weeks from today and if such representation is made, the State Government is directed to take decision on merit, according to the Law and Procedure applicable in this regard, within a period of 8 weeks of the date of such representation."

या प्रश्नाच्या संदर्भात भेदभाव झाला हे मान्य करावयाचे परंतु हा भेदभाव दूर करण्यासाठी शासनाकडून काहीही प्रयत्न होत नाहीत. हे बरोबर नाही. घटनेच्या कलम ११४ प्रमाणे आपल्याला अशा प्रकारचा भेदभाव करता येत नाही, असे असतांनाही या प्रश्नाच्या संदर्भात शासनाकडून भेदभाव झालेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात कोर्टाने २६ नोव्हेंबर, २००७ रोजी ८ आठवडयात निर्णय घ्यावा, असे निर्देश दिलेले आहेत. या विषयाच्या संदर्भात भेदभावाचे एकूण २३ मुद्दे आहेत, हे सर्व मुद्दे महत्वाचे आहेत. २६ नोव्हेंबर,, २००७ रोजी ८ आठवडयात निर्णय घ्यावा, असे कोर्टाने निर्देश दिलेले असतांना एक वर्ष उलटून गेले तरी शासनाकडून काही सुध्दा कार्यवाही झाली नाही, निर्णय घेतला गेला नाही. कोर्टाने जे निर्देश दिलेले आहेत त्याच्या विरुध्द आपल्याला वागता येत नाही. त्यामुळे कोर्टाने सांगितल्या प्रमाणे या विषयाच्या संदर्भात ८ आठवडयात भेदभाव संपुष्टात आणणारा निर्णय घेतला जाईल काय ? तसेच हे जे हायकोर्टाचे कागदपत्र ज्या अधिकाऱ्याने इतके दिवस दाबून ठेवले त्या अधिका-यावर कारवाई केली जाईल काय?

**श्री. राजेश टोपे :** या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. बी.टी. देशमुख यांनी विचारलेल्या दोन्ही प्रश्नांना होय असेच उत्तर आहे.

**श्री. भगवान साळुंखे :** सभापती महोदय, शासन एका बाजूने संगणकीकरणाचा आग्रह धरते परंतु दूस-या बाजूने संगणकीकरणाच्या प्रशिक्षणासाठी लक्ष दिले जात नाही, संगणकीय शिक्षण देणाऱ्या संस्थांना अनुदान देण्यासाठी टाळाटाळ केली जाते. तेव्हा संगणकीकरणाच्या संदर्भात शासनाकडून होणारा हा विरोधाभास बंद केला जाईल काय?

**श्री. राजेश टोपे :** सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातच **माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख साहेबांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. या विषयाच्या संदर्भात उच्च शिक्षण विभागाचा पॉझीटीव्ह रोल** राहील. हा सर्व विषय फक्त उच्च शिक्षण विभागाच्या कक्षेत येत नाही. या विषयाच्या संदर्भात मंत्रिमंडळाचा निर्णय महत्वाचा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांना सांगितल्या प्रमाणे **पुढच्या अधिवेशनाच्या अगोदर हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी आणला जाईल आणि पुढील अधिवेशनाच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेतला जाईल.**

**श्री.कपिल पाटील :** सभापती महोदय, विज्ञानशाखा असलेल्या काही महाविद्यालयांना अनुदान देण्यात आलेले आहे. त्या महाविद्यालयांनी वैकल्पिक विषय बदलले म्हणून त्या महाविद्यालयांना अनुदान नाकारणे बरोबर होणार नाही. यापूर्वी वैकल्पिक विषय असलेल्या महाविद्यालयांना कायम स्वरुपी अनुदान देण्यात आलेले आहे. शासनाने हा भेदभाव केलेला आहे तो योग्य नाही. तेव्हा या संदर्भात शासन धोरणात्मक निर्णय घेणार काय ?

**श्री.राजेश टोपे :** सभापती महोदय, तेच तेच प्रश्न रिपीट होत आहेत. कॉम्प्युटर सायन्स या व्यतिरिक्त अनेक वैकल्पिक विषय आहेत. त्यामध्ये इलेक्ट्रॉनिक्स सायन्स, अभियांत्रिकी शास्त्र, शारीरिक शास्त्र, इत्यादी वैकल्पिक विषय विज्ञान शाखेला जोडण्यात येतात.एखाद्या महाविद्यालयात कॉप्युटर सायन्स असतो. तर दुसऱ्या महाविद्यालयात इलेक्ट्रॉनिक्स सायन्स असतो. हा व्यापक प्रश्न आहे. फक्त कॉम्प्युटर सायन्स पुरता हा प्रश्न मर्यादित नाही. या संदर्भात अभ्यास करावा लागेल. त्यामुळे मंत्रिमंडळासमोर हा विषय घेण्यात येईल व त्याबाबत सकारात्मक विचार केला जाईल अशी खात्री मी सभागृहाला देतो.

* * *

(१)

# संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक

*महाराष्ट्र विधानपरिषद : शनिवार, दिनांक २६ जुलै २००८ : दुसरे अधिवेशन २००८*

**श्री. प्रा.बी.टी.देशमुख व श्री. वसंतराव खोटरे** विधानपरिषद सदस्य यांनी, महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे.

"पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक, याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिनांक २६ नोव्हेंबर २००७ रोजी दिलेला निर्णय, काही महाविद्यालयांना बिनाअनुदान तत्त्वावर व काही महाविद्यालयांना कायम बिना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्याच्या भेदभावपूर्ण वागणुकीबाबत तपासणी करण्याचा स्पष्ट उल्लेख त्या निर्णयामध्ये असणे, या निर्णयानुसार १९ डिसेंबर २००७ रोजी तपशीलवार पत्र पाठवून याचिका कर्त्यांनी भेदभावपूर्ण वागणुकीचे २३ मुद्दे शासनाच्या लक्षात आणून देणे, आठ आठवड्यामध्ये याबाबत शासनाने कायद्याला धरून निर्णय घ्यावा असे मा. उच्च न्यायालयाचे आदेश असतांनासुद्धा याबाबत कोणतीही कारवाई न होणे, "विज्ञान शाखेअंतर्गत संगणक शास्त्र या विषयास काही महाविद्यालयांना अनुदान देण्यात आले" ही बाब शासनाने ६ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये मान्य करणे, आठ आठवड्यात निर्णय होणे तर बाजूलाच राहिले याउलट "कारवाई करणे विभागास शक्य होणार नाही" असे शासनाने ६ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये कळविणे, ह्या सर्व बाबी संगणक शास्त्र अनुदान कृती समितीने दिनांक २६ मार्च २००८ रोजी मा. मंत्री उच्च शिक्षण यांना, उच्च शिक्षण संचालकामार्फत एक निवेदन पाठवून लक्षात आणून दिल्यानंतर सुद्धा याबाबत कोणतीही कारवाई होत नसल्याने शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना.

### मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे निवेदन

इलेक्टॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स, अभियांत्रिकी विज्ञान, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण हे वैकल्पिक विषय म्हणून शिकविले जातात. संगणकशास्त्र विषयाची पदवी प्राप्त केल्यानंतर व्यवसायाच्या चांगल्या संधी उपलब्ध असल्यामुळे हा व्यावसायिक अभ्यासक्रम मानला गेला आहे.

सन १९८८ पर्यंत संगणक शास्त्र विषयास मंजुरी देतांना, नवीन शिक्षक वर्ग नेमावा लागत नसेल तरच प्रत्यक्षात नवीन विषय सुरू करावा या अटीवर शासनाने परवानगी दिली आहे. शासन निर्णय ४ जानेवारी, १९८९ अन्वये टप्प्याटप्प्याने अनुदान मंजुरीचे धोरण शासनाने स्वीकारले. परंतु त्यातील अनुदानाच्या सूत्रात बदल करण्यासाठी शासन स्पष्टीकरण दिनांक ८ ऑगस्ट, १९९१ अन्वये सुधारणा करण्यात आली. शासन निर्णय दिनांक २४ सप्टेंबर, १९९१ अन्वये, संगणक या विषयास कायम विना अनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आलेली आहे असे समजण्यात यावे, असा खुलासा करण्यात आला. संगणकशास्त्र विषयास अद्यापही कायम विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात येते.

२. खालील विशेष परिस्थितीत/कारणांमुळे काही महाविद्यालयातील संगणकशास्त्र विषयास वर नमूद अट शिथिल करून विनाअनुदान तत्त्वावर परवानगी बदलून देण्यात आली आहे.

अ) संगणकशास्त्र हा विषय विज्ञान विद्याशाखेअंतर्गत शिकविला जातो म्हणून **विज्ञान शाखा १०० टक्के अनुदानावर असल्यास संगणकशास्त्र या विषयास ओघाने अनुदान देणे क्रमप्राप्त ठरते** असे समजून अनुदान मंजूर करण्यात आले आहे.

ब) महाविद्यालयांमध्ये विज्ञान विद्याशाखा १०० टक्के अनुदानावर असूनही संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयास कायम विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे विज्ञान शाखेतील प्राध्यापकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव निर्माण होतो असे शासनाच्या निदर्शनास आणले गेल्यामुळे **तात्कालिन परिस्थिती लक्षात घेवून शासन स्तरावर संगणकशास्त्र विषयाची कायम विनाअनुदान तत्त्वाची अट काही महाविद्यालयांच्या बाबतीत काढून टाकण्यात आली आहे.**

शासनाच्या आर्थिक परिस्थितीवर ताण आल्याने केंद्र शासनाशी केलेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने दि. २४ नोव्हेंबर, २००१ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत यापुढे शैक्षणिक संस्थांना कायम स्वरुपी विना अनुदान तत्त्वांवर खाजगी क्षेत्रात नवीन महाविद्यालय उघडण्याची परवानगी देण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला.

अनुदानित संस्थांना अनुदान कशा स्वरुपात वितरित केले जाईल याची कार्यपद्धती शासन आदेश क्र. एनजीसी २०८८/१६५२/विशि-२ (अ), दि. ०४.०१.८९ आणि ०८.०८.९१ च्या आदेशान्वये विहित केले आहे. राज्यामध्ये महाविद्यालयांतर्गत सर्व विद्याशाखांसाठी कायम विना अनुदानाचे धोरण सन २००१-०२ पासून राबविले जात आहे.

याचिका क्रमांक ९९८/२००७ वर **मा. उच्च न्यायालयाने दि. २६.११.२००७ रोजी दिलेल्या आदेशानुसार उचित असा निर्णय घेण्याची बाब विभागाच्या विचाराधीन असून त्याप्रमाणे मंत्रिमंडळासमोर लवकरच प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. त्यात जो निर्णय होईल तो संगणक विद्याशाखांच्या बाबतीत लागू होईल.** शासनास प्राप्त झालेल्या दिनांक १९ डिसेंबर २००७ रोजीच्या पत्रातील २३ मुद्यांचा खुलासा तसेच संगणकशास्त्र विषयाबाबत सुरू असलेल्या कार्यवाहीबाबतची सद्यःस्थिती संबंधित संस्थेला शासनाच्या ६ फेब्रुवारी २००८ च्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे. या अभ्यासक्रमास शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने व या अभ्यासक्रमास अनुदान देण्याविषयीची मागणी अनेक निवेदनांद्वारे (२६ मार्च २००८ सह) शासनाकडे येत असल्याच्या पार्श्वभूमीवर शासन मान्यता दिलेल्या महाविद्यालय/संस्थांची माहिती त्यांच्या एकूण कार्यभारानुसार एकूण शिक्षकांची संख्या, विद्यार्थी संख्या मागविण्यात आली असून त्यानंतर यावर निर्णय घेणे शक्य होणार आहे. **परंतू असा निर्णय घेण्याकरिता काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.**

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY
# NAGPUR BENCH : NAGPUR
# CONTEMPT PETITION NO. 233 OF 2007

Office Notes, Office Memoranda of Coram, appearances, court's orders or directions and Registrat's orders. Courts or Judge's orders

(Vaidya K.G. Dabadkar & ors V/s Maharashtra and Others)

**CORAM : B.P. DHARMADHIKARI, J. : SEPTEMBER 15, 2008.**

Heard Shri Haq, learned counsel for the petitioners and Smt. Dangre, Learned Additional Government Pleader for respondents No. 1 to 6.

The Petitioners have approached this court pointing out that respondents have failed to implement the directions issued by the division bench of this court on 14.6.1996 in Writ petition Nos. 3508 of 1992 and other connected matters. The division bench by these directions has asked the state Government to implement the Pension-cum-Gratuity Scheme within 12 weeks from its judgement and to make it applicable to teaching and non teaching employees of non-government aided Ayurvedic and Unani Colleges affiliated to University of Pune and Nagpur and also to employees in the Hospitals attached thereto, after such staff exercised the option which was to be invited within four week. This order was challenged by state of Maharashtra in Civil Appeal No 2878-79 of 1997 before the Hon'ble Apex Court and the Hon'ble Apex court has disposed of this civil appeal on 7.4.1997 by following observations :-

"In view of the respective contentions. The only question that arises for consideration is : whether the High court would be justified to grant the pension and gratuity scheme to the teachers working in the Ayurvedic, Unani and Homeopathic aided institutions. It is seen that pursuant to the direction issued by this court, the pension and gratuity scheme were extended to the law colleges from 1995. Whether the scheme could be extended or not is a question of an executive policy and the court would not take the responsibility of directing the Government to extend the policy. Court requires examination as to how the policy laid down is being worked out. It is stated that since huge financial outlay is involved in extending the benefits and the Government is not intending to deny the benefit to the segment of the teachers, we appreciate the stand taken by the Government. The Government is, therefore, directed to consider extension of the benefit of pension and gratuity scheme to the teachers working in the Ayurvedic, Unani and Homeopathic aided educational institutions"

After this on 27.6.2001, Government has found it impossible to extend such benefits to the petitioners because of lack of financial capacity.

On last occasion, it was pointed out to this Court that after this resolution, some of the beneficiaries of the High court orders approached the Hon'ble Apex court by filling interim applications and those interim applications were rejected in motion by the Hon'ble Apex court. The parties have taken time to produce those interim applications on record and today the learned additional Government pleader has filed copy of such interim application along with pursis.

Shri Haq, learned counsel for the petitioners contends that refusal to implement pension scheme is in breach of orders of division bench of this court and therefore, case for contempt is made out.

The additional Government pleader states that in view of subsequent dismissal of interim application by the Hon'ble Apex court, there is no question of this court considering the issue of contempt. According to her issue stands concluded and there is no contempt. In the alternative it is argued that the order of the hon'ble Apex Court dated 7.4.1997 substitutes the judgement of the High court and therefore action for contempt is for breach of order of the hon'ble apex court and in view of the judgment of this court in the case of Maubhai vs. State of Maharashtra, reported at 1996 (2) Hh. L.J. 615, the high court cannot punish for the contempt of orders of the Honble apex court. The reliance is also placed upon the judgment of the hon'ble apex court in the case of Jahreswar prasad paul vs. Tarak Nath Ganguly, reported at 2002 (5) SCC 352, to urge that the court in contempt jurisdiction cannot grant substantive relief not convered by the order or judgement, which was subject matter of court proceedings and if there is any doubt about its meaning or interpretation, the parties to the proceedings must

## MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

*Registered under the Trade Union Act 1926, Reg.No.By-II-8162 of 1985*

Vidyapeeth Vidyarthi Bhavan, 'B' Road, Churchgate, Mumbai-400 020.

## रविवार, दिनांक २१ डिसेंबर २००८ रोजीच्या आमसभेने सम्मत केलेला प्रस्ताव

**as adopted at the GC Meeting on Sunday, 21st December 2008 at Mumbai**

केन्द्र शासनाचे मानव संसाधन राज्यमंत्री यांनी महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यासंदर्भात दिनांक १६ डिसेंबर २००८ रोजी लोकसभेत निवेदन केले असून केंद्रीय मंत्रिमंडळाने विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारशीलेली सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यासंदर्भातील सारे तपशिल त्या अधिकृत निवेदनामध्ये उपलब्ध झालेले आहेत. प्रत्यक्ष केंद्राचा शासन निर्णय उपलब्ध होण्याची वाट न पहाता या निवदेनातील तपशिलाच्या आधारावर महाराष्ट्रातील महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना ताबडतोबीने हे प्रस्ताव लागू करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतची कारवाई महाराष्ट्र शासनाने सुरु करावी अशी विनंती करण्यात येत आहे.

महाराष्ट्रामध्ये २० लाख सरकारी व निमसरकारी कर्मचारी व शिक्षक यांच्या वेतन पुनर्रचनेचा शासन निर्णय (ज्या बद्दल केन्द्र शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य उपलब्ध होत नाही) निर्गमित होतो व मग त्यानंतर अनेक महिन्याच्या विलंबाने महाराष्ट्रात विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन श्रेणीचे शासन निर्णय (ज्या बद्दल केन्द्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध होते) निर्गमित होतात असा १९८६ व १९९६ मध्ये झालेल्या वेतन पूनर्रचनेच्या वेळी आलेला अनुभव लक्षात घेता असा ठराव करण्यात येत आहे की, उपरोक्त निवेदन प्रसृत झाल्यापासून एक महिन्याच्या आत महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन श्रेणीचा शासन निर्णय निर्गमित व्हावा.

कोणत्याही परिस्थितीत २० लाख सरकारी व निमसरकारी कर्मचारी व शिक्षक यांच्या वेतन पुनर्रचनेचा शासन निर्णय (ज्या बद्दल केन्द्र शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य उपलब्ध होत नाही) निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवत असतांना त्याच वेळी महाराष्ट्रामधील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतन श्रेणीचे शासन निर्णय (ज्या बद्दल केन्द्र शासनाकडून ८० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध होते) निर्गमित करण्यासाठीचे प्रस्ताव सुध्दा मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात यावेत याची योग्य ती काळजी उच्च शिक्षण विभागाने घ्यावी अशी विनंती करण्यात येत आहे.

be directed to approach the Hon'ble apex court again.

Shri Haq, learned counsel, on the other hand, relies upon the judgment of the hon'ble apex court in the case of Indian oil corporation limited vs. State of Bihar, reported at AIR 1986 SC 1780, to state that the dismissal of special leave petition in motion does not operate as bar to filing of writ petition under article 226 of the constitution of India. Before the High court. He, therefore, states that the dismissal of interim application by the Hon'ble apex court, which may be for more than one reasons, cannot preclude this court from exercising the jurisdiction.

**The perusal of judgment of division bench of this court shows that this court found the petitioners entitiled to benefit of pension-cum-gratuity. Scheme and accordingly issued the directions.** The Hon'ble apex court has no doubt in penultimate paragraph found that whether to extend such scheme or not is within the domain of the executive and the court will not interfere in the matter, however, before the hon'ble apex court, the Government made a statement that it is not intending to deny the benefit of pension and gratuity to the segment of the teachers and the hon'ble apex court appreciated that stand of Government. The hon'ble apex court, therefore observed and directed the Government to consider extension of such benefit of pension and gratuity in phased manner. It is, therefore, clear that the hon'ble apex court has not contemplated the total denial of said benefit to the petitioners. This order of the hon'ble apex court has been considered by the division bench of this court in the case of suresh S Naik vs. Karamveer Hire rural, reported at 2000 (2) Bom. C.R. 522. wherein the division bench has reached similar conclusion. **It is, therefore, clear that there is no doubt about what the hon'ble apex court has said in its order.**

**The basic entitlement has been found in favour of the petitioners by the division bench of this court and the hon'ble apex court has maintained it.** I, therefore find that there is no question of any substitution of order of this court by the hon'ble apex court. This court, therefore, can find out whether there is any breach of directions issued by the division bench or not.

However, in the present facts, it is apparent that after the hon'ble apex court decided the matter, the case was under consideration of government and then the Government has taken a particular decision. The decision was then placed before the hon'ble apex court in interim application and the Hon'ble Appex Court did not find it necessary to interfere at that stage and therefore, interim application came to be rejected. Therefore, though I find that Government resolution dated 27.6.2001 is against the mandate of this court. Still at this stage I am not inclined to hold that it constitutes contempt.

**Time is given to the Government to reconsider the issue. List the matter for further consideration on 17th November 2008.**

A copy of this order be furnished to the learned additional Government pleader.

*****

(१३)

## स्थाननिश्चितीबाबत सहसंचालक उच्च शिक्षण यांचे स्तरावर वेळेवर निर्णय होणेबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २००८*

***बुधवार, दिनांक १७ डिसेंबर २००८***

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर २००८ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक*

(९३) * ४६१८६ **प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विविक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४२१६० ला दिनांक २१ जुलै, २००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संलग्न महाविद्यालये किंवा विद्यापीठातून काम करणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ किंवा निवडश्रेणीमध्ये स्थाननिश्चितीच्या संदर्भात काही अनियमितता झालेली असल्यास ती बाब १५ दिवसाच्या आत संचालकांच्या लक्षात आणून द्यावी व कोणत्याही परिस्थितीत याबाबतचा निर्णय १५ दिवसाच्या आत करावा असे जे आदेश सर्व उच्च शिक्षण सहसंचालकांना देण्यात आले आहेत त्यानुसार १ फेब्रुवारी २००८ ते ३० सप्टेंबर, २००८ या काळात विभागवार उच्च शिक्षण सहसंचालकाकडे एकूण किती प्रकरणे प्राप्त झाली त्यांची विभागवार वर्गवारी कशी आहे,

(२) विभागवार किती प्रकरणी वेळेच्या आत व किती प्रकरणी विलंबाने निर्णय घेण्यात आले,

**श्री. दिलीप वळसे-पाटील** : (१) राज्यातील सर्व विभागीय सहसंचालकांकडे प्राप्त झालेली प्रकरणे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र . | विभाग | प्राप्त | निकाली | त्रूटी | विलंब |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | ४९ | ४९ | -- | -- |
| २. | मुंबई | १३२ | ४१ | ९१ | -- |
| ३. | नागपूर | १८७ | १८७ | -- | -- |
| ४. | अमरावती | ४२ | ४२ | -- | -- |
| ५. | नांदेड | ४६ | ४६ | -- | -- |
| ६. | जळगांव | ५९ | ५९ | -- | -- |
| ७. | कोल्हापूर | ४१ | ४१ | -- | -- |
| ८. | औरंगाबाद | ३० | ३० | -- | -- |
| | एकूण | ५८६ | ४९५ | ९१ | -- |

(२) विभागवार सर्व प्राप्त प्रकरणे वेळेच्या आत निकाली काढण्यात आली असून फक्त मुंबई विभागात ९१ प्रकरणांमध्ये त्रूटी असल्यामुळे ही प्रकरणे त्रूटींच्या पूर्ततेसाठी संबंधित महाविद्यालये व विद्यापीठाकडे परत पाठविण्यात आली आहेत.

*****

*PR :- **(1) to (6)** P 1 to 11 & 13 NB 07 **(7) to (11)** P 48 to 50 NB 08 **(12)** P 90 NB 08 **(13)** P 07 NB 09*

## महाराष्ट्र शासन

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, हैद्राबाद हाऊस,नागपूर**

**क्रमांक : शिकाना २००८(५७/०८)/माशि-२**

**दिनांक २३ डिसेंबर, २००८**

प्रति,

शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य. पुणे.

**विषय** :- अनुदान प्राप्त शाळांतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वेळोवेळी लागू करण्यात येणाऱ्या महागाई भत्त्याच्या वाढीबाबत.

वित्त विभागामार्फत वाढीव महागाई भत्त्याचे आदेश निर्गमित करतांना शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचारी असा उल्लेख करतात. **इतर पात्र कर्मचाऱ्यांमध्ये राज्यातील मान्यताप्राप्त अनुदानित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा अंतर्भाव होतो.**

२. शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्रमांक एसएसएन १०९९/(३२०/९९)/माशि-२, दिनांक ६ जानेवारी, २००० अन्वये महागाई **भत्ता लागू करण्यासाठी स्वतंत्रपणे पुन्हा आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता नाही.**

३. अर्थसंकल्पीय अंदाज शासनास सादर करतांना, दोन वाढीव महागाई भत्त्याची अंदाजीत रक्कम वार्षिक वेतनवाढ गृहित धरुन चालू वर्षापेक्षा साधारणतः २० टक्के वेतनावरील वाढीव खर्च दर्शविणे अपेक्षित आहे. असा खर्च दर्शविण्यास राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसोबतच पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता वित्त विभागाच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या महिन्यात देता येवू शकतो.

४. वाढीव महागाई भत्ता शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच देय होण्यासाठी वरील प्रमाणे अर्थसंकल्पीय प्रक्रिया पार पाडण्याबाबत सर्व संबंधितांना निर्देश देण्यात यावे.

**५. राज्य शासनामार्फत यापुढे देय होणारा वाढीव महागाई भत्ता पात्र शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना देतांना तो नियमित तरतुदीतूनच शासन निर्णयात नमूद केलेल्या महिन्यात देण्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना निदेश देण्यात यावेत.**

**६. वाढीव महागाई भत्ता विहीत महिन्यात अदा न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध गंभीर स्वरुपाची कार्यवाही करण्यात येईल याबाबतही सर्व संबंधितांना कृपया जाणिव करुन देण्यात यावी.**

७. तसेच सदरहू प्रकरणात दिरंगाई केलेल्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करुन अनुपालन अहवाल सादर करावा. अन्यथा याप्रकरणी आपणास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**(अ.मा. भट्टलवार)** शासनाचे उप सचिव

# वाढीव महागाई भत्ता विलंबाने लागू करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

***महाराष्ट्र विधानपरिषद : बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २००८ : तिसरे अधिवेशन २००८***

(१) * ४६२३० **श्री. वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे, श्री.दिलीपराव सोनवणे , प्रा. बी. टी. देशमुख** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दरवेळी महागाई भत्ता वाढ देतांना "प्रत्येक विभागाने स्वतंत्रपणे शासन आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता रहाणार नाही मंजूर अनुदानातच तो खर्च करावा" असे शासनाचे स्पष्ट आदेश असतांना दरवेळी महागाई भत्ता विलंबाने लागू करणाऱ्या शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या अमरावती जिल्हा कार्याध्यक्षांनी दिनांक २३ ऑगस्ट, २००८ रोजी किंवा त्या दरम्यान मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचेकडे शिक्षणाधिकारी (माध्य.) अमरावती, यांच्यामार्फत एक निवेदन पाठवून केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या या धोरणामुळे दिनांक १ जानेवारी २००८ पासून लागू झालेल्या वाढीव महागाई भत्त्याचा शासन निर्णय जरी दिनांक १६ मे, २००८ रोजी निर्गमित झाला असला तरी त्याची प्रत्यक्ष अमंलबजावणी माहे जुलै-ऑगस्ट, २००८ मध्ये करण्यात आल्याचे या तक्रारीत नमूद करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) "पुरवणी मागणी मान्य झाल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत थकीत देयके देऊ नये" असे आदेश (क्रमांकःअमाशा/२००७-०८ वाढीव म.भ./१५ क ४) शिक्षण संचालकांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २००७ रोजी काढले व बरीच आंदोलने झाल्यानंतर त्याच शिक्षण संचालकांनी दिनांक १२ जून, २००८ रोजी आदेश (क्रमांक अशामा/०८-०९/वाढीव म.भ./१५ क ४) काढून "वरील परिस्थितीचा विचार करता वेगळी तरतुद उपलब्ध झालेली नसली तरी मुळ मंजूर तरतुदीतून वाढीव महागाई खर्च करण्याची परवानगी दिली" ही गोष्ट खरी आहे काय,

(४) सदरहू तक्रारीच्या निवारणार्थ शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(५) नसल्यास, याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत?

**डॉ. पतंगराव कदम** : (१) होय.

(२) होय.

(३) दिनांक १ जुलै, २००७ पासुन मान्य झालेला वाढीव महागाई भत्ता नियमीत तरतूदीतून अदा करावा तथापी थकबाकी पूरक मागणी मान्य झाल्याशिवाय देवू नये असे शिक्षण संचालकांनी दिनांक ६ ऑक्टोबर, २००७ च्या पत्रान्वये निर्देश दिलेले होते. त्याच धर्तीवर दिनांक १ जानेवारी, २००८ पासुन मान्य झालेला वाढीव महागाई भत्ता नियमीत तरतूदीतून अदा करावा तथापी थकबाकी पूरक मागणी मान्य झाल्याशिवाय देवू नये असे शिक्षण संचालकांनी दिनांक १२ जून, २००८ च्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

(४) व (५) राज्य शासनाने दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये जुलै, २००८ पासुन मान्य केलेला ७ टक्के वाढीव महागाई भत्ता शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमीत वेतनात अदा करण्याबाबत दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ च्या पत्रान्वयें शिक्षण संचालकांना निर्देश देण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने शिक्षण संचालकांनी सर्व शिक्षणाधिकाऱ्यांनी दिनांक १ नोव्हेंबर, २००८ च्या पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

**श्री. वसंतराव खोटरे** : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणारे आहे. कारण ज्यावेळेस केंद्राप्रमाणे वाढीव महागाई भत्ता राज्यातील कर्मचाऱ्यांना लागू होतो तो एकाच वेळी सर्वांना लागू करावा असा शासन निर्णय ६ जानेवारी, २००० रोजी शासनाने काढलेला आहे. त्यात असे म्हटले आहे की, "सुधारित दराने महागाई भत्ता देण्याबाबतचे वित्त विभागाचे आदेश मान्यताप्राप्त शाळातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील व त्यासाठी प्रत्येक वेळेस स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता असणार नाही." असे असतानाही सहा सहा महिने या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ही रक्कम दिली जात नाही, याचे कारण काय ? तसेच ज्यावेळेस शासकीय कर्मचाऱ्यांना हे आदेश लागू होतील त्याच वेळेस शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करणार काय ?

**डॉ. पतंगराव कदम** : महोदय, **हे खरे आहे की, विभागातील काही लोकांनी ही चूक केली आहे. परंतु शासनाने यासंबंधीचे कालच स्पष्ट असे आदेश काढलेले आहेत की अशा प्रकारे पुन्हा आदेश काढण्याची आवश्यकता नाही. ज्यावेळेस सरकारी कर्मचाऱ्यांबाबतचा निर्णय होतो त्याच वेळेस शिक्षकांना सुध्दा महागाई भत्त्याची रक्कम देण्यात यावी.**

**प्रा. बी.टी.देशमुख** : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर समाधानकारक आहे. परंतु गेली दोन वर्षे शासनाचे शिक्षण संचालक व उपसंचालक तसेच शिक्षणाधिकारी असा प्रकार करीत आहेत. अशा प्रकारे प्रत्येक जण वेगवेगळे आदेश काढतो म्हणून याच सभागृहात यासंबंधी चार-पाच वर्षापूर्वी मोठा संघर्षही झाला होता. यासंबंधीच्या आदेशांमध्ये असे लिहिलेले असते की, यासंबंधी वेगळे आदेश काढण्याची आवश्यकता नाही, त्या अनुदानातूनच वाढीव महागाई भत्ता देण्यात यावा. तरी सुध्दा आमचे हे अधिकारी कृपावंत होऊन असे लिहितात की, सध्याच वाढीव महागाई भत्ता देऊ नका मग लिहितात फार आंदोलने होत आहेत, आता सर्व देऊन टाका. याचा अर्थ हे शिक्षणाधिकारी, संचालक व उपसंचालक शिक्षकांवर मेहेरबानी करीत आहेत असा होतो अशा प्रकारे शासनाने काढलेल्या आदेशांची अंमलबजावणी हे अधिकारी करीत नाहीत. म्हणून ज्यावेळेस शासकीय कर्मचाऱ्यांना वाढीव महागाई भत्ता लागू होईल त्याच वेळेस या सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक मधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनाही तो लागू करणार काय? तसेच ज्या अधिकाऱ्यांनी हे नियमबाह्य काम केले त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय?

**डॉ. पतंगराव कदम** : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख तसेच सन्माननीय सदस्य श्री. खोटरे साहेबांनी यांनी जे प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत त्यासंदर्भात आदेश काढण्यात आलेले असून ज्या अधिका-यांनी यासंदर्भात चुका केल्या असतील त्यांची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल.

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO. MAHBIL/ 2001/4448** Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **09.01.2009**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---------------------------------------------------

To,......................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

..........................................................................